दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम
रविवार पुरवणी १३ एप्रिल २०२५

# महिला सक्षमीकरणाचे उद्गाते : महात्मा ज्योतिबा फुले

माधव अंकलगे,
रत्नागिरी

आपल्या भारतीय संस्कृतीचा इतिहास फार मोठा आणि प्राचीन आहे. या भारतीय संस्कृतीचा आपण विचार केला तर आपल्या लक्षात येते की, भारतात एक काळ मातृसत्ताक राज्यपद्धती होती. महत्वाचे म्हणजे ज्यावेळी मातृसत्ताक राज्यपद्धती होती, त्यावेळी भारतातून सोन्याचा धूर निघत होता. मात्र काळाच्या ओघात सत्तांतर झाले आणि राज्यव्यवस्था पितृसत्ताक झाली. मात्र काही काळातच याच पितृसत्ताक व्यवस्थेमुळे भारतात परकीय आक्रमणे झाली आणि परकीयांची गुलामी आली. याच काळात स्त्रियांना अक्षरशः गुलाम म्हणूनच वागणूक दिली जात होती. त्यांना कसलाही आधार नव्हता. चूल आणि मूल, रांधा, वाढा आणि उष्टी काढा यापलीकडे स्वातंत्र्य नव्हते. त्याहूनही धक्कादायक म्हणजे त्यांच्यावर अनेक निर्बंध घातले गेले. त्यात केशवपन, शिक्षणास विरोध, बाल हत्या, सतीप्रथा, बाल विवाह, विधवांना यातना या व अशा अनेक निर्बंधामुळे स्त्रीचे जगणे नकोसे झाले होते. अशावेळी त्यांना या यातनातून मुक्ती दिली पाहिजे अशा विचाराने प्रेरित होऊन पुण्यात महात्मा ज्योतिबा फुले यांनी मोठे काम उभारले म्हणून त्यांना स्त्री मुक्तीचे जनक म्हणतात.

एक विचारवंत असे म्हणतात की, जर तुम्ही एखाद्या पुरूषाला शिक्षण दिले, तर तुम्ही एका पुरूषाला शिक्षित करता. जर तुम्ही एखाद्या स्त्रीला शिक्षण दिले, तर तुम्ही एका पिढीला शिक्षित करता. त्यानुसार महात्मा फुले यांनी काम केले.

भारतीय समाजामध्ये महिला अनेक शतकांपासून दुय्यम स्थानावर राहिल्या होत्या. त्यांना शिक्षण, संपत्ती, निर्णय घेण्याचा आणि मोकळेपणाने जगण्याचं देखील अधिकार नव्हता. अशा परिस्थितीत एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व समाजात उभं राहिले ते म्हणजे महात्मा ज्योतिराव फुले. त्यांनी समाजाच्या रुढी, परंपरा, अंधश्रद्धा यांना आव्हान देत महिलांच्या उन्नतीसाठी ठोस पावलं उचलली. म्हणूनच त्यांना महिला सक्षमीकरणाचे उद्गाते असं गौरवपूर्वक म्हटलं जातं.



काम करून लोकांना न्याय मिळवून दिला अत्यंत कमी वयातील मुली ज्यावेळी चितेवर, व्यवस्थेकडून या सतीच्या नावाखाली नाहक मारल्या जाऊ लागल्या, त्यावेळी हे सर्व पाहून महात्मा फुले यांनी या सतीप्रथेचा तीव्र निषेध करत त्यांच्या विरोधात काम करून लोकांना न्याय मिळवून दिला. महात्मा फुले यांचा ठाम विश्वास होता की, स्त्री आणि पुरुष हे समान आहेत. आणि दोघांना समान संधी मिळायला हव्यात. त्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. चळवळी उभारल्या. कोणत्याही समाजाचा विकास होण्यासाठी स्त्रियांना शिक्षण, आरोग्य, रोजगार, आणि सन्मानाची गरज आहे.त्यांनी आपल्या लेखांमधून आणि भाषणांमधून ह्या मुद्द्यांचा प्रचार केला. त्यासाठी त्यांनी १८७३ साली त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.या समाजाच्या माध्यमातून त्यांनी जातीभेद, अज्ञान, अंधश्रद्धा आणि स्त्रीशोषण याविरुद्ध लढा उभारला.

स्त्रियांच्या शिक्षणामुळेच त्या स्वावलंबी, आत्मनिर्भर आणि सशक्त बनतील, असा त्यांचा ठाम विश्वास होता. आज भारतात महिलांना अनेक क्षेत्रात प्रगती करता येते, त्याचं श्रेय थेट महात्मा फुले यांच्या दूरदृष्टीला आणि प्रयत्नांना जातं. त्यांनी जे बीज पेरलं, त्याचा वटवृक्ष आज उभा आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांचं संपूर्ण जीवनच महिला सक्षमीकरणासाठी वाहिलं गेलेलं होतं. त्यांच्या विचारांनी आणि कृतींनी आजही लाखो महिलांना प्रेरणा दिली आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांचं संपूर्ण जीवनच महिला सक्षमीकरणासाठी वाहिलं गेलेलं होतं.

महात्मा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुण्यात एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. सामाजिक कार्यात काम करण्याची तळमळ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यासोबतच समाजातील विदारक चित्र पाहून ते खुप उद्विग्न झाले. त्यांनी समाजाच्या या परिस्थितीची चिकित्सा केली. त्या चिकित्सेच्या आधारे त्यांनी पुढील सिद्धांत मांडला....

**विद्येविना माती गेली,**
**मतिविना नीती गेली,**
**नीतिविना गती गेली,**
**गतिविना वित्त गेले,**
**वित्ताविना शूद्र खचले,**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले!!**

आणि त्यानुसार त्यांनी या सर्व समाजाच्या आणि विशेषतः महिलांच्या शोषण आणि मागासलेपणाचे कारण शिक्षण असल्याचे निदान केले. म्हणून त्यांनी मुलींना शिक्षण देण्यासाठी सुरुवात केली. शिक्षण देण्याची संकल्पना चांगली होती; पण शिक्षण देणार कोण हा प्रश्न मात्र अनुत्तरित होता. म्हणून त्यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिकवून स्त्रीशिक्षणाचा पाया रचला. १८४८ साली त्यांनी पुण्यातील भिडे वाड्यात भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. त्या काळात स्त्रियांना शिकवणं हे समाजविरोधी मानलं जात होतं, म्हणून त्यांना खुप अडचणी आल्या, मात्र महात्मा फुले किंवा सावित्रीबाई फुले यांनी माघार घेतली नाही.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी मुलींच्या शिक्षणास सुरुवात झाल्यानंतर विधवांच्या पुनर्विवाहाला पाठिंबा दिला आणि स्त्रियांना सामाजिक सन्मान मिळावा यासाठी प्रयत्न केले. फक्त प्रयत्नच केले नाहीत, तर त्यांनी तसे विधवा पुनर्विवाह घडवून आणले त्यामुळे महिलांना जगण्याची नवी दिशा मिळाली. याच दिशेतून अनेक महिला या भविष्यात यशस्वी झाल्या. विधवांच्या नरकयातना महात्मा फुले यांनी दूर केल्या.याच विधवांना सतीप्रथेसारख्या अमानवी प्रथेचा स्वीकार तत्कालीन व्यवस्थेने करायला लावला.अत्यंत कमी वयातील मुली ज्यावेळी चितेवर, व्यवस्थेकडून या सतीच्या नावाखाली नाहक मारल्या जाऊ लागल्या, त्यावेळी हे सर्व पाहून महात्मा फुले यांनी या सतीप्रथेचा तीव्र निषेध करत त्यांच्या विरोधात

त्यांच्या विचारांनी आणि कृतींनी आजही लाखो महिलांना प्रेरणा दिली आहे. त्यांनी आपल्या विचारांनी आणि कृतींनी भारतीय समाजात महिलांच्या हक्कांसाठी क्रांती घडवून आणली. महात्मा फुले यांनी स्त्रियांना शिक्षण, समानता, आणि आत्मसन्मान दिला. महात्मा फुले यांचं संपूर्ण आयुष्य हे महिला सक्षमीकरणासाठीच समर्पित होतं. शिक्षण, पुनर्विवाह, समाजात स्त्रियांना समान हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी मोठा संघर्ष केला. त्यांचं कार्य केवळ त्या काळापुरतंच मर्यादित नाही, तर आजही त्याचा प्रभाव समाजावर दिसून येतो. त्यांच्या कार्यामुळे अनेक स्त्रिया शिक्षित, सक्षम आणि आत्मनिर्भर झाल्या.म्हणूनच आपण त्यांना अभिमानाने महिला सक्षमीकरणाचे उद्गाते म्हणतो.

आज समाजात मोठ्या प्रमाणात महिला सक्षमीकरण आणि याबाबतच्या गोष्टी केल्या जातात, मात्र कोणत्याही प्रकारची उपलबधता नसतानाही महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी केलेला संघर्ष हा खुप मोठा होता. स्त्रिया सक्षम झाल्या पाहिजे यासाठी त्यांनी केलेला क्रांतिकारी उठाव हा खऱ्या अर्थाने भविष्यात स्त्रियांना मार्गदर्शन करणारा ठरला.

त्यांच्या याच कार्यामुळे प्रभावित होऊन महात्मा गांधी यांनी त्यांना असली महात्मा म्हटले, स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी त्यांना क्रांतिकारी समाजसुधारक म्हटले तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तर त्यांना आपले गुरू मानले. विचाराने, कर्तृत्वाने फार मोठी उंची महात्मा फुले यांना लाभल्यांतरही त्यांनी कधीही आपल्या विचारांशी प्रतारणा केली नाही किंवा आपल्या चळवळीशी असणारा विचार कधी सोडला नाही. म्हणूनच महात्मा फुले हे खरे उद्धारक ठरतात. आज समाजात महिला ताठ मानेने जगतात, अभिमानाने समाजात वावरतात आणि कर्तृत्वाने खूप मोठ्या आकाशात भरारी घेतात. मात्र त्या आकाशात भरारी घेण्याचे सामर्थ्य महात्मा फुले यांनी केलेल्या त्यागात आणिचळवळीत आहे हे विसरता कामा नये.

आज ११ एप्रिल २०२५. म्हणजेच महात्मा ज्योतिबा फुले यांची १९८ वी जयंती. या जयंतीनिमित्त त्यांच्या लोकोत्तर कार्याला विनम्र अभिवादन!

परवा कसा, कुठून आला माहित नाही, पण मी शाळेत काढून ठेवलेल्या चप्पलमधून उंदराचे एक पिल्लू बाहेर पडले. चिंटुकले गोंडस पिल्लू इकडून तिकडून मस्त उड्या मारू लागले. वाट दिसेल तिकडे तुरुतुरु धावू लागले. "उंदीर... उंदीर..." ओरडत काही मोठी मुले त्याचा पाठलाग करु लागली. असा कोणी प्राणी अवचित अवतीर्ण झाला की आमचा श्रवण त्याचा लागलीच 'बंदोबस्त' करतो. मी देखील नक्की काय घडले ते बघण्यासाठी मुलांच्या गर्दीत पुढे झालो. उंदीर हा तसा फारच उपद्रवी प्राणी. तो जसा शेतकऱ्यांना त्रास देतो तसा तो शाळेतही फार त्रास देतो. एखाद्या वेळेस नजरचुकीने कपाटात शिरलाच तर अनेक महत्वाच्या कागदपत्रांचा विध्वंस करतो. त्यामुळेच कधी एखादा उंदीर समोर दिसला आणि आवाक्यात असला तर कधी एकदा त्याला पकडून मारू इतका त्याचा राग येतो. मात्र उंदरांची छोटी छोटी पिल्ले फार गोंडस दिसतात. कधीतरी साफसफाई करताना अशा पाच सहा पिल्लांचा घोळका तावडीत सापडतो. मात्र अशा वेळेस त्यांची दया येते. छोट्या पिल्लांना मारावेसे वाटत नाही.

शाळेच्या पायऱ्यांवरून खाली उतरुन तो छोटा उंदीर मैदानातून इकडे तिकडे धावू लागला तेव्हा मुलांनी जणु त्याची 'पाकट'च धरली. अशा उपद्रवी प्राण्यांच्या बंदोबस्तासाठी प्रसिद्ध असलेला श्रवण तर हिरांची झाडू घेऊनच मैदानात उतरला. उंदीर लहान असो की मोठा, त्याला ठेचायलाच हवा अशा आविर्भावात तो झाडूचा मुगडा मुठीत आवळून उंदरामागून धावू लागला. एक दोनदा उंदीर श्रवणच्या झाडूच्या जाळ्यात अडकलाच होता. मात्र तरीही मोठ्या शिताफीने सुटून इकडे तिकडे धावत होता. मला त्या छोट्या उंदराची दया आली होती. "आपण त्याला जंगलात सोडूया, पण त्याला ठार मारू नका." अशी विनवणी मी करत होतोच. मात्र त्या धावपळीत, धुमश्चक्रीत पळता पळता तो छोटा उंदीर नेमका त्याला पकडण्यासाठी धावणाऱ्या सौम्याच्या पायांत अडखळला आणि तिचा पाय त्याच्यावर टर्रकन पडला. एकदाच मोठ्यांदा 'चूss' आवाज करीत उंदीर तिथेच पडला. त्याचे हात पाय दुमडून ताठ झाले. त्याचे सर्वांग थरथरु लागले. त्याच्या डोळ्यांत मैदानातली माती गेली होती. त्याच्या एका डोळ्यातून रक्त वाहू लागले.

मघापासून त्याला पकडण्यासाठी धावणारी मुले त्या उंदराची अवस्था बघून स्तब्ध, शांत झाली. क्षणभरासाठी तिथे नीरव शांतता पसरली. सौम्या तशी साधीभोळी, सालस, प्रामाणिक व प्रेमळ मुलगी. शाळेत कधी कुणाला धावताना, पडताना लागले, खरचटले तर ती भावूक बनते, रडकुंडीस येते. एखाद्याला कधी खरचटल्यावर प्रथमोपचार पेटी घेऊन त्वरीत मदतीस येणारी सौम्या पहिली मुलगी असते. आपल्या पायाखाली चिरडून या छोट्या उंदराची अशी अवस्था झाली, त्याच्या या अवस्थेला आपणच जबाबदार आहोत अशी अपराधीपणाची भावना तिच्या मनात उत्पन्न झाल्यामुळे ती रडकुंडीस आली.



# संवेदनशील मुले

## मनाच्या हिंदोळ्यावर



बाबू घाडीगांवकर, त्रिंबक,
ता.मालवण.
मो.९४२१७९५९५५.

लगेच व्हरांड्यात जाऊन तिने पाणी भरून एक मग आणला. त्या मगातले पाणी ती त्या उंदरावर बोटांनी शिंपडू लागली. मात्र त्या उंदराचे थरथरणे काही थांबत नव्हते तेव्हा माझ्याकडे बघत सौम्या म्हणाली," सर, याला आपण डॉक्टरांकडे नेऊयात का? मी बाबालाही बोलावून घेते." मी सौम्याला समजावीत म्हणालो," बेटा, आता हा उंदीर जगू शकेल असे वाटत नाहीय. काही सेकंदांचाच तो सोबती आहे असे मला तरी वाटतेय. पण तू काही एवढे मनाला लावून घेऊ नकोस. अगं उंदीर आहे तो. उद्या मोठा झाल्यावर तो उपद्रवीच बनला असता की नाही?"



माझा अंदाज खरा ठरला आणि पुढच्या पाच दहा सेकंदांत त्या उंदराचे थरथरणे कमी होत गेले. चारही पाय ताठ ताणत तो बिचारा गतप्राण झाला. मात्र सौम्याच्या बालमनास हा उंदराचा विषय फार लागला.

उंदीर मेल्यावर त्याचे शेपूट पकडून बाहेर रस्त्यापलीकडे नेऊन फेकण्याच्या तयारीत असलेल्या श्रवणला तिने थांबवले. अवजारांच्या खोलीतून कुदळ आणत त्या दोघी तिघींनी बागेतच एक छोटा खड्डा खणला. त्या मृत उंदराला अलगद उचलून खड्ड्यात ठेवला. बागेतली दोन चार फुले त्या उंदराला वाहिली. सर्वांनी ओठातल्या ओठात पुटपुटत घडलेल्या अपराधाबद्दल क्षमा मागत श्रद्धासुमने अर्पण केली. त्या मुलांमधली ही अपार संवेदनाशीलता पाहून मी अवाक झालो.

आपल्या शाळेत सौम्यासारखी अशी संस्कारी, मूल्ये जपणारी मुले घडत आहेत, नव्हे ती स्वतःच्या आचरणात आणीत आहेत याचा अभिमान वाटला. मोबाईल फोनच्या आहारी गेलेल्या, आईवडिलांपासून दुरावलेल्या, आजी आजोबांपासून दूर गेलेल्या आजच्या मुलांच्या अनेक गोष्टी आपण ऐकतो, अनुभवतो. सध्याच्या काळात लहान मुले संवेदनशून्य बनत चालली आहेत अशा प्रकारची टीका टिप्पणीही अनुभवतो. मात्र आमच्या शाळेतली सौम्यासारखीच सर्व मुले अजिबात संवेदनशून्य नाहीत, तर ती संस्कारमूल्ये जपणारी संवेदनाशील मुले आहेत, ती सगळी आमच्या शाळेत घडत आहेत हे इथे मुद्दाम नमूद करताना मला निश्चित अभिमान वाटतो.

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार मधून आपल्या बातम्या ,अडचणींना थेट वाचकांपर्यंत पोहोचविण्यात येतील आणि तुमच्या नावासहित त्यांना प्रसिद्ध करण्यात येतील. लेख,कथा,कविता - SINDHUDURG.SAMACHAR@GMAIL.COM वर पाठवाव्यात. जाहिरातीसाठी 9822979732 आणि KDRUPA@GMAIL.COM येथे आणि KDRUPA@GMAIL.COM येथे संपर्क करावा**



# लग्न सराई

## गावाकडच्याआठवणी



भाग- १४

भावेश लोंढे,
दापोली
मोबा. ९७६९३८६०९१



मार्च,ते मे महिन्यापर्यंत गावागावात लग्न होत असतात. हे तीन महिने म्हणजे लग्न सराईचा काळ.इथे पारंपरिक विवाह सोहळे म्हणजे नुसते दोन व्यक्तींचे नव्हे, तर दोन कुटुंबांचे, कधी कधी तर दोन गावांचेही बंध अधिक दृढ करणारे प्रसंग असतात. कोकणातील लग्न म्हणजे परंपरा, श्रद्धा, आनंद, स्नेह आणि नात्यांची गुंफण या साऱ्यांचे जिवंत दर्शन.

लग्नाची पूर्वतयारी आणि आमंत्रण देणे इथपासून ते लग्न झाल्यानंतर पाच परतावना पर्यंत हा सोहळा सुरू असतो.

कोकणात लग्न ठरण्यापासूनच गावभर एक वेगळाच उत्साह दिसून येतो. पाहुणे अगदी आधीपासून बोलावले जातात.

आमंत्रणपत्रिका दिल्या जातात.अगदी चापून चोपून सारवण काढलेले अंगण असते.त्या अंगणात मेढी रोवुन सुबक मांडव घातले जाते.मांडव घालण्यासाठी वाडीतील माणसे केली जातात. त्यांना जेवण घातले जाते.नवीन मेढी,नवीन वासे,नवीन माणगे,असे सारे नवीन साहित्य वापरले जाते.चारी बाजूंनी कामट्या बांधून सल्दी बांधली जातात.अंगण बंदिस्त केले जाते. येण्याजाण्यासाठी पायंडीसमोर मोकळी जागा ठेवली जाते.मातीच्या भिंती गेरूने रंगवल्या जात असत.त्यावर नवरा नवरीचे नावे लिहत असत.

लग्नाच्या दोन तीन महिने आधी पत्रावळ्या करीत असू.रानात जाऊन पळशीची,वडाची पाने जमा करायची.रात्री वाडीतील बायका एकत्र येत.लग्नाची गाणी म्हणत पत्रावळ्या विणत असत.वधू,वराला चिडवत असत.किती वर्हाड येणार त्याप्रमाणे पत्रावळ्या तयार करत.त्या सुकवणे,शंभर शंभरगठ्ठे बांधून मांडवावर ठेवत. संपूर्ण लग्नकार्यात पंगती उठायच्या त्या सर्व पानाच्या पत्रावळीवर. तो पत्रावळीचा वास आणि त्यावर भात डाळ आणि भाजी याचा सुगंध मिलाप झाला की वेगळीच चव जेवणात उतरायची.त्यात सगळे जेवण चुलीवर शिजायचे त्यामुळे जेवणाला अप्रतिम चव असायची.मातीचा स्पर्श आणि मायेचा गोडवा यामुळे जेवणाची लज्जत आपसूक वाढायची.

जेवण बनवण्यासाठी सरपण लागायचे ते दिवस म्हणजे सोपनाफोडणी दिवस.गावातील गडी नेमून रानात जाऊन फाटी फोडली जायची.सर्व वाडीला जेवण होत असे. सरपणासाठी खास आंब्याची फाटी तोडली जायची हे विशेष.पुन्हा एवढ्या लांबून ती फोडलेली सोपना बायका डोक्यावरून आणत असत. त्यांना चायपानी होत असे.

साखरपुड्याच्या आधी मांडवात कागदी पताका लावत असत. आता सारखी कापडी मंडप कापडत नसत.एक तर रेडीमेड पताका आणून किंवा रंगेबेरंगी कागद आणून पताका कापत असत. वाडीतील मुले रात्री एकत्र येत.कोणी पिठाची चिक्की करायचा जण मोठा आणि समजदार मुलगा सूत बांधायचा. मग काही मुले पताकांना गम लावून एक पताका दोऱ्याला चिकटव्याला देत असत. जसे अंगण असेल त्या प्रमाणे रांगा करीत असत.मांडवात छान शोभतील अशा उभ्या आडव्या रांगा लावून मांडव शोभिवंत करीत असत. घरापासून मुख्य रस्त्यापर्यंत सुद्धा पताकांनी रस्ता सजावट करीत असत.मुख्य रस्त्यावर सुरमाडाची कमानी बांधत असत.जणू रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या लग्नाची खबर मिळत असे. करवल्या मुली नवर देवाला,देवीला ऊन लागू म्हणून छत्री सजवत असत. यामध्ये तांदूळ,फनगुल्या वापरत असत.पिठापासून सुद्धा आकर्षक बारीक बारीक डिझाईन करून अधिक सुंदर करीत असत.यामध्ये. मणी आणि खड्यांच्या सुद्धा वापर करीत असत.तसेच मुंडावळ्या पण घरीच करवल्या मुली तयार करीत असत.आता मात्र सगळं रेडिमेड मिळतं. तो उत्साह,तो आनंद मात्र पहिल्यासारखा मिळत नाही.

जेवण बनवण्यासाठी रणपी निवडत असत.मग जेवणासाठी वाडीतील आणि बाजूच्या वाडीतील भांडी जमा करायची असत.त्या भांड्यांची यादी करून परत मोजून पोच करायची.हरवली तर त्याचे पैसे भरायचे. पाहुणे मंडळींसाठी दहा ऐक खुर्च्या इकडून तिकडून जमा करायच्या. नवरानवरीसाठी राजाराणीची खुर्ची शोधायची.नाहीच भेटली तर मग त्यातल्याच दोन चांगल्या खुर्च्या ठेवायचा.चटई, ताडपत्री मांडवात बसण्यासाठी आणून ठेवायची.लामणदिवा अंगणात सतत तेवत ठेवायचा.मांडव दारावर बांधण्यासाठी केळ तोडून आणायची.आंब्याची,वडाची पाने खांडवा फोडण्यासाठी जमा करून ठेवायची.अशी अनेक बारीक सारीक कामे का करायला लागायची. गावात पत्रिका वाटल्या जातात.पण पहिल्यासारखे आता आवताण दिले जात नाही.पत्रिके सोबत तांदळाची भाकरी,किंवा पीठ दिले जायचे.ती भेट म्हणून आवडीने स्वीकारून लग्नाचे आमंत्रण स्वीकारले जायचे. सहकुटुंब लग्नाला येत असत.आता घरातील कुणीतरी एक जण येतो.पाकीट भेटवून निघून जातो.ना नातेवाईकांची भेट होत. नाही कुणाशी बोलता येत नाही. आवताण दिले नाही म्हणून पूर्वी रुसवे फुगवे पण असायचे.पण लगेच मिटले पण जायचे.तेवढ्यापुरता रुसवा असायचा.पण राग मुळीच नसायचा.

साखरपुडा व्हायचा.महिला मंडळातील एक महिला नेमून हळद गावात फिरवली जायची.गाव देवळात आणि सीमेवर हळद ठेवली जायची. बाहेरच्या गावात जायचे असेल तर सीमापूजन व्हायचे. धोक्याच्या ठिकाणी नारळ वाढवले जायचे.टेम्पोने किंवा ट्रकने वरात घेऊन जात असत. बाया बापे,पोरं पोरी मजा करत त्या वाहनाने जात असत. प्रवासात लग्नाची गाणी म्हणत किंवा भेंड्या लावत मजा मस्ती करीत वऱ्हाड लग्न स्थळी पोहचायचे. खालुबाजा आणि सनई वादन असायचे. क्वचितवेळी बेंजोपार्टी असायची. त्या गावात पोहचल्यावर पहिला जानवसा बसायचा. भेटी गाठी व्हायच्या.दोन्हीकडून रुकवात पोहचायची. पेटकरी मामाची तारांबळ उडायची. पण त्या त्या वेळी ती भूमिका निभावणे प्रत्येकजण उतावळा असायचा.नवरा जानवसावरून उठायचा आणि लग्न मंडपात येतो.लग्न पार पडतो. पुन्हा घरी येऊन त्याच्या जाणवस्या बसतो. वरात भरताना खरी मजा येते. खालुबाजावर नाचत नाचत वरात भरली जाते. पूर्वी बनाटी खेळ व्हायचे. गॅसबतीवर वरात हळूहळू पुढे सरकायची. लग्न मांडवात नवरा नवरी येतात. मुहूर्तमेढी भेटतात.आणि घरी प्रवेश करतात.पुन्हा पंगत उठते.सर्व शांत होतात.रात्री करमुकीचा कार्यक्रम म्हणून तमाशा व्हायचा. दुसऱ्यादिवशी पुन्हा विधी होतात. उलगवणी होते.पाच मागा परततात आणि गाव कुसावरचा लग्नसोहळा पार पडतो.

ही लगीन सराई पार पडता पडता मात्र यजमानांच्या नाकी नऊ येतात.पण लग्न झाले.मोठे कार्य पार पडले. टेन्शन कमी झाले याचे सुख मात्र जास्त असते.



**७.३ हक्काचे पत्रक (नमुना नं.६) उतारा**

**अ. क्र. ६ - रकान्यामध्ये फेरफार झालेले हिस्सा नंबर आणि त्यांचे क्षेत्रफळ आदी तपशील दिलेला असतो. त्यावरून ज्या जमिनीत फेरफार झालेले आहेत त्याचे स्थान समजण्यास मदत होते.**

**अ. क्र. ७ - यामध्ये दिलेली माहिती ही महत्त्वाची असते. ज्या आधारावर संबंधित हक्कबदल केलेला असतो त्याचे जे कागदपत्र असतात किंवा ज्या आ**देशाच्या आधारे हक्कबदल केला जातो त्याचा तपशील या रकान्यात लिहिलेला असतो. यामध्ये जर एखादा हक्कबदल एखाद्या नोंदणीकृत दस्तऐवजाच्या आधारे झालेला असेल उदा. खरेदीखतामुळे, हक्कसोडपत्रामुळे, इच्छापत्रामुळे झालेले हक्कबदल अशा साऱ्या हक्कबदलांची माहिती या रकान्यात दिलेली असते. एखाद्या न्यायालयाच्या अथवा वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे जर एखादा हक्कबदल झाला असेल तर त्याचा तपशील उदा. क्र. तारीख आदी सर्व गोष्टींची नोंद या रकान्यामध्ये होते.

**अ. क्र. ८ - या ठिकाणी हा दाखला कोणत्या तलाठ्याने दिला हे आपणाला समजते तसेच त्या ठिकाणच्या माहितीवरून आपल्याला तलाठी सजा समजू शकतो.**

**अ. क्र. ९- या ठिकाणी ज्या दिवशी ७/१२ दिला त्या दिवसाची तारीख घातलेली असते. या तारखेमुळे कोणत्या तारखेपर्यंत हक्कबदलासंबंधी नोंदी मंजूर झालेल्या आहेत ते समजते.**

**या साऱ्यावरून आपल्याला गाव नमुना सहा संबंधीची माहिती मिळाली. गाव नमुना सहा या उताऱ्याचे महत्त्वदेखील आपल्याला त्यामुळे कळून आले. याबरोबरच आपण या अगोदर पाहिलेल्या गाव नमुना ६ अ, ब, क, ड यांची थोडीफार माहिती घेऊया. गाव नमुना ६ अ, ब, क, ड या साऱ्या उपनोंदवह्या आहेत. अर्थात त्या उपवह्या आहेत म्हणून काही त्यांचे महत्त्व कमी होत नाही. या उपनोंदवह्यादेखील हक्कबदल करण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरतात म्हणून आपण त्यांच्याबद्दल थोडीफार माहिती करून घेऊया.**

गाव नमुना सहा 'अ' या उपनोंदवहीत विवादात्मक प्रकरणांची नोंद केली जाते. यामध्ये निरनिराळे रकाने असतात. सुरुवातीलाच अनुक्रमांक दिला जातो. त्यानंतर फेरफार नोंदवहीतील अनुक्रमांक किंवा अधिकाराच्या अभिलेखाच्या कच्च्या प्रतीची नोंद ह्या ठिकाणी केली जाते. त्यानंतरच्या रकान्यामध्ये ज्या जमिनीचा ६ 'अ' चा उतारा असेल त्या जमिनीचे भूमापन क्रमांक आणि त्याच्या उपविभागाची नोंद केली जाते. त्यानंतर या बाबत कुणाची हरकत असेल किंवा कुणी हरकत घेतली असेल तर त्या हरकतीची तारीख त्या रकान्यामध्ये नोंदली जाते. यानंतरच्या रकान्यामध्ये ज्या पक्षकाराने या जमिनीसंबंधी विवाद उत्पन्न केला असेल त्या विवादाचा तपशील, पक्षकाराचे नाव, पत्ता इत्यादी. महत्त्वाची माहितीदेखील यामध्ये नोंदवून ठेवली जाते. यानंतरच्या रकान्यामध्ये या विवादासंबंधी संबंधित अधिकाऱ्याने जर काही निर्णय दिलेला असेल त्या निर्णयाची नोंद या रकान्यामध्ये करावयाची असते. यावरून गाव नमुना ६ अ मधील नोंदी कशा प्रकारच्या असतात हे वाचकांच्या लक्षात येईल.

यानंतर गाव नमुना ६ ब बद्दलची माहिती आपण पाहूया. हीदेखील एक उपनोंदवहीच असते. यामध्ये कलम १५२ प्रमाणे दंडाच्या नोंदी केलेल्या असतात. या उताऱ्यातदेखील सर्वात वरती उताऱ्याचे नाव लिहिलेले असते.

# कायद्याचे बोलूया!



श्रीनिवास भार्गवराम घैसास,
वकील- उच्च न्यायालय व नोटरी-
भारत सरकार
भ्रमणध्वनी- 9869080714.



## भाग -3
## जमिनीसंबंधी महत्त्वाचे उतारे

**ज्येष्ठ विधिज्ञ श्रीनिवास घैसास हे 'कायद्याचे बोलूया' या साप्ताहिक सदरातून सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचे विषय अगदी सोप्या शब्दांत वाचकांसमोर ठेवत आहेत. आजपासून ते जमीन व त्याविषयीची कायदेशीर माहिती याबाबत लेखन करत आहेत. वाचकांना त्यांच्या लेखांमधून शेतजमीन, बिनशेती जमीन, आरक्षण, कूळकायदा, फसवणूक व त्यावरील उपाय याबाबतीत माहिती मिळेल.**

त्यानंतर या नोंदवहीचे नाव म्हणजे विलंब शुल्क प्रकरणाची नोंदवही असे नाव दिलेले असते. त्यानंतर गाव, तालुका, जिल्हा आदींची नोंद असते. त्यानंतर या उताऱ्याच्या पहिल्या रकान्यात गाव नमुना ६ मधील नोंदीचा क्रमांक असतो. त्यानंतर दुसऱ्या रकान्यात अधिकार संपादन करणाऱ्यांचे अथवा दस्तऐवज ज्यांचेजवळ आहे त्याचे नाव लिहिले जाते. त्यानंतर रकाना क्र. ३ मध्ये सदर प्रकरणी किती दंड झाला आहे याचा तपशील असतो. तसेच त्यासंबंधाने तहसीलदार/मामलेदार यांनी दिलेला आदेश आदीची माहिती असते. त्यानंतरच्या रकान्यात संबंधित व्यक्तीने दंड भरला असेल तर त्या दंडाच्या पावतीचा क्रमांक व दिनांक यांचा तपशील लिहिलेला असतो. या उपनोंदवहीवरून विलंब शुल्कास पात्र झालेल्या प्रकरणांची माहिती आपणास मिळू शकते.

गाव नमुना सहा क ह्या उपनोंदवहीत वारसा प्रकरणे नोंदलेली असतात. या नोंदवहीवरून वारसांसंबंधीची माहिती आपणास मिळू शकते. आता या उताऱ्यातील रकान्यांची माहिती आपण पाहूया. सर्वात वरती या उताऱ्याचे नाव म्हणजे गाव नमुना सहा क असे नाव ठळक अक्षरात लिहिलेले असते. त्यानंतर या उताऱ्यातील माहिती देणाऱ्या अशा नावाची नोंद असते. हे नांव म्हणजे वारसा प्रकरणांची नोंदवही हे होय. त्यानंतर नेहमीप्रमाणे गाव, तालुका, जिल्हा आदी सर्व तपशील दिलेला असतो. त्यानंतर उताऱ्यामधील पहिला रकाना असतो तो अनुक्रमांचा. त्यामध्ये अनुक्रमांक दिलेला असतो. त्यानंतर रकाना क्रमांक २ मध्ये भोगवटादार किंवा इतर हक्क धारण करणाऱ्याचे, परंतु सध्या हयात नसलेल्यांचे नाव लिहिलेले असते. त्यानंतर रकाना क्र. ३ मध्ये ह्या भोगवटादाराचा अथवा इतर अधिकार धारण करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्यूचा दिनांक लिहिलेला असतो. त्यानंतर रकाना क्र. ४ मध्ये गाव नमुना ८ अ मधील जुन्या खात्याचा क्रमांक दिलेला असतो. पाच नंबरच्या रकान्यामध्ये त्याच्या (मृत व्यक्तीच्या) कायदेशीर वारसांची नावे लिहिलेली असतात. त्यानंतर रकाना क्रमांक ६ मध्ये सर्व वारसांपैकी प्रत्यक्ष कब्जा असलेल्या वारसांची नावे लिहिलेली असतात. त्यामध्येच एकत्र कुटुंबप्रमुख वगैरेसारख्या नोंदी केलेल्या असतात. यानंतर तहसीलदारांनी जर काही भोगवटादार म्हणून नोंद करण्याचा अथवा इतर अधिकार या रकान्यात काही नोंद करण्याचा आदेश दिला असेल तर त्याचा तपशील ७व्या रकान्यामध्ये समाविष्ट असतो. रकाना क्र. ८ मध्ये यासंबंधी जो काही निर्णय संबंधित जमिनीच्या अनुषंगाने घेतला गेला असेल त्याचा तसेच गाव नमुना ६ मध्ये असणाऱ्या नोंदीचा तपशील या रकान्यात दिला जातो. यामुळे वारस, गाव नमुना ६ मधील प्रत्यक्ष नोंद, तहसीलदारांचा आदेश, प्रत्यक्ष कब्जाधारक आदी सर्व माहिती आपणास या गाव नमुना ६ 'क' मध्ये मिळू शकते. म्हणूनच गाव नमुना ६ 'क' ही नोंदवही महत्त्वाची अशी नोंदवही आहे.

यानंतर आपण गाव नमुना ६ 'ड' ची माहिती पाहूया. गाव नमुना ६ 'ड' ही नोंदवही ही पोटहिश्श्याची नोंदवही असते. ही नोंद करताना एखाद्या हिश्श्याचे पोटहिस्से कसे पाडले आहेत याचा कच्चा नकाशादेखील त्याच्यासोबत काढावा लागतो आणि असा नकाशा काढायचा असेल तर अर्थातच तलाठ्यांना संबंधित जागेला भेट द्यावी लागते व जाग्यावर प्रत्यक्ष कसे हिस्से पाडले आहेत ते पाहावे लागतात. त्यानंतरच त्याचा कच्चा नकाशा बनवता येतो. प्रत्यक्ष पाहाणीमुळे कागदावर नोंद असलेल्या जमिनीच्या व प्रत्यक्षात असणाऱ्या जमिनीच्या क्षेत्रफळामध्ये काही तफावत असल्यास ती समजते. कित्येक वेळा पावसामुळे जमिनीची धूप होते. कित्येक वेळा गाळ साचून जमिनीचे क्षेत्रफळ वाढते. काही वेळा जमीन बिनशेती केल्याने जमिनीचे पोटहिस्से बदलतात. हे सारे कच्च्या नकाशात दाखवले तर मोजणीचे काम किती बाकी आहे हे लक्षात येईल. त्यावरून एकूण मोजणी करण्याचे काम किती उरले आहे याचा एकत्रित अंदाज अभिलेखा खात्याला घेता येतो. म्हणूनच ही गाव नमुना ६ ड ही नोंदवही एकूण फार महत्त्वाची आहे. या नोंदवह्यांतील नोंदी बरोबर आहेत किंवा नाहीत है तसेच प्रत्यक्ष जाग्यावर जाऊन/स्थळाला भेट देऊन या नोंदवह्यांमधील नोंदी बरोबर आहेत किंवा नाहीत ह्याचीदेखील खात्री नोंदणी अधिकारी, तहसीलदार यांनी करायची आहे. या साऱ्यावरून गाव नमुना ६ 'ड' ही नोंदवही किती महत्त्वाची आहे हे आपल्या लक्षात येईल. त्यानंतर आपण गाव नमुना सहा 'ड' मध्ये कोणत्या ठिकाणी कोणती माहिती दिलेली असते ती पाहूया.

गाव नमुना सहा 'ड' पाहिल्यास सर्वात वरती या उताऱ्याचे शीर्षक आपणाला छापलेले दिसते. त्यानंतर ही नोंदवही कसल्या नोंदीसाठी आहे हे दर्शवणारा म्हणजे 'नवीन उपविभाग (पोट हिस्से) नोंदवही', असा शीर्षकवजा मजकूर असतो. त्यानंतर डाव्या बाजूला सर्वांत प्रथम रकाना असतो तो गाव नमुना ६ मधील फेरफार नोंद क्रमांकाचा, या रकान्यात गाव नमुना ६ मधील फेरफार नोंद क्रमांक लिहिलेला असतो. त्यानंतरच्या रकान्यात भूमापन क्रमांक किंवा त्याच्या उपविभागांचा क्रमांक लिहिलेला असतो. त्यानंतरच्या रकान्यामध्ये नकाशामध्ये जे बदल करणे आवश्यक असते त्याचा तपशील कच्चा नकाशा काढून दाखवलेला असतो. उदा. एखाद्या हिश्श्याचे उभे ३ हिस्से करणे.

(क्रमशः)



# विवाह -भाग २

## अध्यात्म



ज्योतिर्विद उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४

मागील भागावरून पुढे..

ज्योतिषशास्त्रात अनेक त्रिकालज्ञानी विद्वान ऋषीमुनींनी, ग्रंथकारांनी वैवाहिक सौख्याच्या आणि प्रपंचाच्या नांदीसाठी ग्रह, राशी आणि नक्षत्रे यांच्या कर्तृत्वांच्या आधारावर अनेक सूत्रे निर्माण केली आहेत. त्यायोगे ज्योतिषशास्त्रात वधु-वरांचे 'गुणमेलन व पत्रिकामेलन' यांचा समावेश आहे. मानवी जीवनाचे मुख्य उद्दिष्ट 'मोक्ष' साधण्यासाठी साधावयाच्या चार पुरुषार्थांसाठी करावयाच्या कर्मांसाठी स्त्री आणि पुरुष यांच्यातील 'कार्यक्षमतेच्या मेळाची' नितांत आवश्यकता आहे. हा मेळ कसा साधता येईल याबाबत ज्योतिषशास्त्रात मार्गदर्शन केले आहे. वधू-वरांच्या गुणमेलनात आठ प्रकारच्या कसोट्यांसाठी छत्तीस गुणांची योजना आहे. या आठ प्रकारच्या कसोट्या म्हणजे-

१) 'वर्ण' : यासाठी १ पैकी गुण आहे. यामध्ये वधू-वरांच्या परस्पर व्यक्तित्वाची आणि प्रकृतीची जोड साधते का याचा विचार केला जातो. ही जोड साधली तर उभयता एकमेकांना उत्तम व्यावहारिक साथ देतात. यामुळे व्यवहार साध्य होतो आणि सहकार साधतो. उभयता सहमताने व्यवहाराची जोडणी करताना आढळतात. याउलट वर्णमेळ साधला नाही तर मतांतरे होताना दिसून येते. अशा प्रकारचा वर्णाचा नकारात्मक मेळ वैवाहिक जीवनासाठी उपयुक्त नसतो किंबहुना क्लेशाचा होऊ शकतो.

२) वश्य : यासाठी २ पैकी गुण आहेत. यामध्ये परस्परांमधील आकर्षण, अधिनता यांचा विचार केला जातो. वधू-वरांचे परस्परांमध्ये आकर्षण नसेल, वधू-वर परस्परांच्या समान अधिन नसतील तर दोघांमधील तसेच कुटुंबातील एकतेला, एकात्मतेला बाधा संभवते. कधी एकमेकांमध्ये दुरावा होऊ लागल्यामुळे विवाह विच्छेद झालेले आपण पाहतो तर कधी दोघांमध्ये सख्य असले तरी कुटुंबातील अन्य माणसांशी पटत नसल्याने विवाह-विच्छेद (घटस्फोट) झाल्याचे आपण पाहतो. विवाह-विच्छेद नाही झाला तरी घरात वादविवाद सुरूच राहतात. विवाह हा वधूकडील आणि वराकडील, दोन्हीकडील कुटुंबांचा मेळ साधण्यासाठी असतो. तो साधेल किंवा नाही याबाबत 'वश्य' सदरात पडणाऱ्या गुणमेलनाने साधारणतः विचार करता येतो.

३)'तारा' : याला ३ पैकी गुण आहेत. यामध्ये वधू-वर यांच्या नक्षत्रांच्या स्वामी ग्रहांचा मेळ पाहून उभयतांच्या भाग्याचा मेळ विचारात घेतला जातो. या मेळावर वधू-वरांचे आयुष्यबळ, वैवाहिक मार्गावरील ताळमेळ, विरह, वियोग याबाबत कल्पना येते. हा मेळ साधत नसल्यास वैवाहिक वैफल्य पदरी पडते. उलट पक्षी हा तारामेळ उत्तम साधला असल्यास वैवाहिक सौख्याला योग्य दिशा व चालना मिळू शकते.





४) 'योनी' : यासाठी ४ पैकी गुण आहेत. यामध्ये वर आणि वधू यांच्या लैंगिक सुखाचा विचार केला जातो. शिवाय उभयतांच्या मानसिकतेचाही विचार येथे होत असतो. शरीरसंबंधाची क्रिया आणि त्यावेळीं असलेली उभयतांची मानसिकता यावर मन, आत्मा आणि शरीर यांचे ऐक्य आणि सौख्य निर्भर असते. होऊ घातल्या जाणाऱ्या संततीच्या मानसिक, शारीरिक आणि आत्मिक जडण-घडणीवर त्याचे परिणाम होत असतात. शिश्न व योनी यांच्या आकाराचा, रचनेचा योग्य मेळ साधला गेल्यास समागम सुलभ होतो या उलट मेळ साधला गेला नसल्यास त्रासदायक परिणाम होत असतात. योनीगुणांवरून समागम सुलभ होईल, सुखद होईल, कष्टप्रद होईल अथवा त्रासदायक, दुःखदायक होईल, दोघांचीही कामतृप्ती साधेल का याबाबत अंदाज येतो. योनीमेळ साधत नसल्यास लैंगिक संबंधातून गुप्तांगांना स्पर्शरोग संक्रमण (infecton) होवू शकते ज्यातून वेदना प्राप्त होतात व शरीरसंबंध नकोसा वाटू लागतो. यातून पती-पत्नीमध्ये परस्परांविषयी तक्रार होऊ लागते आणि परस्परांमध्ये दुरावा निर्माण होण्याची संभावना राहते. पती-पत्नीमध्ये शरीरसुखात दरी निर्माण होऊन वैकल्य निर्माण होते. यातून पुढे विवाहबाह्य संबंधांकडे निसर्गतः स्वाभाविकपणे कोणा एकाचा किंवा दोघांचाही कल जाऊ शकतो. वैवाहिक जीवनात शरीर सुखाचे महत्व हे प्राधान्याने आहे. कोणत्याही धर्मात विवाह संस्काराने उभयांमध्ये लैंगिक सुखासाठी नाते जोडण्यासाठी सामाजिक सहमती, मान्यता दिली जाते.

५) 'ग्रहमैत्री' : यामध्ये वधू आणि वर यांच्या जन्म नक्षत्रांच्या स्वामीग्रहांचा मेळ विचारात घेतला जातो. यासाठी ५ पैकी गुण असतात. यामध्ये वधू व वर यांच्यात मैत्रीचा सुमेळ राहील की शत्रुत्व राहील याबाबत अंदाज होतो. अनेकदा आपण एकमेकांसाठी एकमेकांचा जीव देणारी जोडपी पाहतो. हा एकमेकांमधील सकारात्मक मैत्रीचा उच्चतम टप्पा झाला. काही वेळा आपण एकमेकांचे जीव घेणारी जोडपीही पाहतो. याबाबतच्या बातम्या वर्तमानपत्रात नित्य येतच असतात. हे अघोरी परिणाम पती-पत्नी यांच्यामधील शत्रुत्वाचे नकारात्मक परिणाम होत. मैत्रीत होणाऱ्या बाधेमुळे विश्वासघात आणि बेबनाव होताना दिसून येतात. यामुळेही वैवाहिक जीवन तणावपूर्ण बनते. विघातक बनू शकते. यासाठी ग्रहमैत्री जाणून घेणे आवश्यक असते.

६) 'गण' : याला ६ पैकी गुण असतात. यामध्ये वधू-वरांच्या एकमेकांच्या स्वभावाचा मेळ पाहिला जातो. परस्परांमधील आदराचे प्रमाण विचारात घेतले जाते. यामध्ये उत्तम मेळ साधल्यास दोघंही परस्परांचा मान-सन्मान, आदर राखत असतात. दोघांमध्ये सुसंवाद असतो. दोघे एकत्र मिळून एकमेकांना साथ देऊन कार्य सिद्धिस नेत असतात. गणमेळ साधला नसल्यास पती-पत्नीत परस्परांबद्दल आदर राहत नाही. दोघांपैकी एक, दुसऱ्याचा अवमान करीत असतो किंवा कधी दोघंही एकमेकांचा पाडाव करीत असतात. एकमेकांना घालून पाडून बोलत असतात. सुसंवादाला गालबोट लागते.

# किल्ल्याच्या चोहोबाजूने बांधलेली भरभक्कम भिंत म्हणजे तटबंदी






**'गड किल्ल्याचे स्थापत्य शास्त्र'**

लेखक : विलास भि. कोळी
संपर्क. 9763 08 4499
kolivilas2@gmail.com

**गड किल्ले बांधकामात अंदाजपत्रकाचे न उलगडलेला इतिहास.**

कोणत्याही इमारतीचे बांधकाम करताना प्रथम नकाशे तयार करावे लागतात. आत्ताचे सारखे नकाशे पूर्वी करत होते का? त्यात उभ्या व आडव्या भिंती. दरवाजे-खिडक्या किती जाडीच्या, काय मापाच्या किती उंचीच्या व त्याची मांडणी कशी करायची. त्याचप्रमाणे तुळ्या, कड्या, तक्तपोशी, छपराच्या कैच्या, आडे, पाखाड्या काय मापाची करावयाची, किती उंचीवर बसवायची हे दाखवण्यासाठी उभे व आडवे छेद दाखवत होते का?

गड किंवा त्यातील वाडे समोरून पाहिले असता कसे दिसेल, बाजूने आणि मागे उभे राहिले असता कसा दिसेल? कंगण्या, मुंढेऱ्या, खांब, कमानी त्यांना बसवावयाचे कठडे, पानपट्टी असे दर्शनी भाग कसे दिसतील. यासाठी नकाशे करत असणार का? (आज आपण ज्याला प्लान, इलीव्हेशन, सेक्शन म्हणतो) ज्यात भिंतीची जाडी, दरवाजे, खिडक्यांची मापे, तळखडे, कड्या, पाटणी, कैच्या पाखाड्या यांची मापे स्पष्टपणे दिसतील असे बघत असणार का? जाळ्या, महिरपी, कमानी, मुंढेऱ्या यांचे आकार त्यातील खाचाखोचा व ती प्रत्यक्ष तयार करावयाच्या वेळी लागणारी मापे, दगड घडणारे पाथरवट व नक्षीचे लाकूड काम करणारे सुतार त्यांना फर्मे कापून नक्षीच्या कामाचे नकाशे सुद्धा तयार करून देत असणार का? प्रत्येक प्रकारचे काम कसे करावयाचे याची सविस्तर खुलासेवार टाचणे लिहिलेली असणार का?

अशा टाचणात कोणत्या प्रकारचा मालमसाला वापरावयाचा, पायात/जोत्याला किंवा भिंतीला कोणत्या प्रकारच्या दगडाचे बांधकाम करावयाचे. हे अगोदर ठरवत असणार का? दगड बांधकामात तिन चार प्रकार आहेत. जसे जमिनीच्या खालील बांधकाम दिसणार नाही तेथे (अनकोर्सड रबर मेशनरीमध्ये) दगड बांधकाम केलेले दिसते. व जमिनीच्या वरचे बांधकाम घडीव दगडाचे (कोर्सड रबर मिशनरी मध्ये) केलेले दिसते. त्यामधेही भिंतीला कडक-टणक दगड व जिथे नक्षी करावयाची आहे तेथे थोडा मऊ दगड वापरलेला अभ्यासांती आपल्या लक्षात येते. हे काम कारागिरांना कसे सांगत असतील.

चुन्यात- वाळू किती घालावयाची , जमिनीला फरशा कोणत्या जातीच्या बसवायच्या. छत कोणत्या प्रकारचे करायचे. जसे कडीपाट , नक्षीचे, कलाकुसर युक्त हे अगोदर ठरवत असणार का? कैच्यांचे व त्यावर कोणत्या प्रकारच्या पाखाडी , वासे , रिपा , कौले बसवायचे. दरवाजे व खिडक्या कोणत्या प्रकारच्या करायच्या , चौकटीची लाकडे काय मापाची व झडपा कोणत्या प्रकारच्या व किती जाडीच्या त्या बसविताना लोखंडी किंवा पितळी सामान वापरायचे का ? या सर्व गोष्टींचा खुलासा करत असणार का ?

अलीकडील बांधकामे करताना , अंदाजपत्रक करताना प्रत्येक काम तपशील पत्रकांवरून किती होईल हे काढतात. उदाहरणार्थ पाया भरावयाचे काम किती





घनफूट आहे हे काढण्यासाठी प्रत्येक भिंतीच्या पायाची लांबी किती रुंदी किती व उंची किती हे क्रमवार लिहून एकंदर सर्व भिंतीचे , पडद्यांचे , जिन्यांचे , पायऱ्यांचे मिळून पायांचे काम किती घनफूट आहे हे काढतात. अशा रीतीने पायांतील बांधकामाला किती रूपये लागतील याचा अंदाज घेता येतो. पूर्वी ही कामे अशी करत असणार. तसेच तुळवंटे , कड्या , खांब , लगी , कैच्या , पाखाड्या , आढे वगैरे कामात किती घनफूट लाकूड लागेल हे काढून दर घनफुटास लाकूडकामाचा जसा भाव असेल त्याप्रमाणे लाकूडकामाला काय खर्च येईल ते काढत असणार का. गलथे , जोते , पानपट्टी , जेथे जास्ती मेहनतीचे किंवा कलाकुसरीचे काम असेल तेथे दर वेगळा पकडत असणार का ? त्याचा अंदाज घेऊन त्याप्रमाणे भाव घालत असणार का ? तसेच जमीनीची फरशी, कौलारूचे क्षेत्रफळ व त्यासाठीचा खर्च कसा काढत असणार. अंदाजपत्रक करताना पायापासून आरंभ करून नंतर जोते , मग पहिला मजला , त्यानंतर दुसरा मजला अशा रीतीने छपरापर्यंत करावी लागणारी सर्व कामे ओळीने घेत असणार का ? कैच्यांना, दरवाजे, खिडक्यांना लागणारे लोखंडी सामान पट्ट्या वगैरे किती टन लागेल याचा अंदाज वेगळा करत असणार का ? त्याचप्रमाणे मोठ्या गाळ्यांची कैच्या-तुळ्या उचलून जागच्याजागी बसवावयास खर्च बराच येत असणार , त्या कशा ठेवत असणार. अशा अधिक होणाऱ्या खर्चाची वेगळी तरतूद केलेली असणार का ?

अशी अंदाजपत्रके केली म्हणजे कोणकोणत्या प्रकारचे किती सामान लागेल हे काढून त्याप्रमाणे सामान तयार ठेवले म्हणजे कामावरील माणसांची खोटी होत नसणार. तसेच अमक्या प्रकारचे घनफूट काम करावयास इतके गंवडी किंवा सुतार, इतके गडी, इतक्या बाया किंवा मुले लागतात हे अनुभवाने ठरलेले असणार. त्याप्रमाणे तितकी माणसे ठेविली असता तितके काम झाले की नाही हे मात्र रोजच्यारोज पाहिलेले असणार. तसेच अमक्या प्रकारच्या दरवाज्यांच्या झडपा करावयास इतका वेळ लागतो हे अनुभवाने ठरलेले. त्याप्रमाणे तितक्या वेळांत ते काम झाले की नाही हे पाहत असणार. अशाच प्रकारची सर्व कामे कामगार लोक रोजच्यारोज करतात की नाही हे रोज पहात असणार. बरोबर देखरेख नसली तर अंदाजापेक्षां खर्च किती जास्ती होईल याचा नेम नसणार. म्हणून या कामावर देखरेख करण्यासाठी अधिकारी नेमलेले असणार.

गड किल्ल्याचे बांधकाम करतेवेळी दिशांचा विचार केलेला असणार, वारा कोणीकडून येतो, पावसाची झड कोणीकडून लागते ती दिशा बांधकाम करताना पाहिलेली असणार. म्हणजे इमारतीत कोणत्या बाजूने ऊन येईल व ऊन येणाऱ्या खिडक्यांना झापे वगैरे करावयास लागतील की काय व पावसाची झड ज्या बाजूकडून लागते त्या बाजूला पडव्या कराव्या लागणार हे पाहत असणार. तसेच जमीनीला ढाळ कोणत्या बाजूला द्यायचा आणि पावसाने पाणी कोणत्या बाजूला काढायचे हे देखील ठरलेले असणार. इमारतीच्या आसपास पाणी सांठून न राहील याची काळजी घेतलेली असणार. बांधकामासाठी लागणारे पाणी, पिण्यासाठी लागणारे पाणी, वापरण्यासाठी लागणारे पाणी याचा ही विचार करावा लागत असणार.

कोणतीही इमारत पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे तोंड करून बांधली असता सकाळी व संध्याकाळी तिचा पुढचा मागचा भाग आत ऊन आल्याकारणाने तापतो. परंतु पश्चिमेकडून वारा येत असल्यास उन्हाचा त्रास बराच कमी होतो. दक्षिणेस किंवा उत्तरेस तोंड करून इमारत बांधली असता ती उन्हाने तापत नाही व दक्षिणेकडून वारा येत असल्यास ती हवाशीर ही होते. वारा, पाऊस साधारणपणे दक्षिण व पश्चिम दिशांकडून येत असल्यामुळे या दोन बाजूंला पडव्या कराव्या लागतात. तशा पडव्या केल्या म्हणजे उन्हाचा व पावसाचा त्रास होत नाही. दूषित झालेली हवा सहज बाहेर निघून जाते व स्वच्छ हवा आत येते. पण रात्रीच्या वेळी जेव्हा दारे व खिडक्या लावलेल्या असतात त्यावेळी शुद्ध हवा व दूषित झालेली हवा बाहेर निघून जावी म्हणून जमीनीपासून ५/६ फूट उंचीवर स्वच्छ हवा येण्यासाठी जाळ्या ठेवलेल्या दिसतात. छप्पर कौलारू असेल त्या ठिकाणी दूषित हवा निघून जाण्यासाठी जाळ्या ठेवण्याची जरूर नाही. कारण वरच्या कौलाच्या फटीतून अशी हवा निघून जाते.



# सरकारी योजना/नोकरी

## कांदा चाळ अनुदान योजना

**कांदा चाळ अनुदान योजना – मुख्य वैशिष्ट्ये**

**उद्दिष्ट**

शेतकऱ्यांना कांद्याच्या साठवणुकीसाठी चाळ बांधण्यासाठी आर्थिक सहाय्य प्रदान करणे, ज्यामुळे कांद्याचे नुकसान टाळता येते आणि बाजारातील अनिश्चिततेवर मात करता येते.

**अनुदानाची रक्कम**

- प्रति टन ₹3,500 पर्यंत अनुदान.
- 25 टन क्षमतेसाठी ₹87,500 पर्यंत अनुदान मिळू शकते.
- महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून कांदा चाळ उभारणीसाठी ₹1,60,367 पर्यंत अनुदान देण्यात येते.

**चाळीचे आकारमान**

- 3.90 मीटर रुंदी, 12 मीटर लांबी, आणि 2.95 मीटर उंचीचे चाळीचे आराखडे विहित करण्यात आले आहेत.

**अर्ज प्रक्रिया**

**अर्ज कसा करावा?**

- महाDBT पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावा.
- अर्ज करण्यासाठी mahadbt.maharashtra.gov.in या वेबसाइटला भेट द्या.

**आवश्यक कागदपत्रे**

- आधार कार्ड
- बँक पासबुक
- ७/१२ उतारा (जमिनीवरील मालकी दर्शविणारा)
- जमिनीवरील कांदा पिकाची नोंद असलेला ८-अ खाते उतारा
- पासपोर्ट साइज फोटो
- कृषि विभागाकडून अनुदान न घेतल्याचा दाखला
- कांदा चाळीचा आराखडा आणि खर्चाचा तपशील

**अर्जाची निवड प्रक्रिया**

- अर्जांची छाननी केल्यानंतर लॉटरी पद्धतीने लाभार्थ्यांची निवड केली जाते.
- निवड झाल्यानंतर त्रिसदस्यीय समिती प्रत्यक्ष पाहणी करून अनुदान मंजूर करते.

**पात्रता**


- वैयक्तिक शेतकरी, शेतकरी गट, सहकारी संस्था, कृषि उत्पन्न बाजार समित्या आणि कांदा उत्पादक सहकारी संस्था या योजनेसाठी पात्र आहेत.
- वैयक्तिक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त 100 मे.टन क्षमतेच्या कांदा चाळीसाठी ₹1,50,000 पर्यंत अनुदान मिळू शकते.
- सहकारी संस्थांना जास्तीत जास्त 500 मे.टन क्षमतेच्या कांदा चाळीसाठी ₹7,50,000 पर्यंत अनुदान मिळू शकते.

**अधिक माहिती आणि संपर्क**

- अधिक माहितीसाठी आपल्या तालुक्याच्या कृषी विभागाशी संपर्क साधा.
- तसेच, अधिकृत माहिती आणि मार्गदर्शनासाठी कृषी विभाग, महाराष्ट्र शासन या वेबसाइटला भेट द्या.

**टीप:** कांदा चाळ बांधण्यापूर्वी विहित नमुन्यातील आराखडा आणि अर्ज संबंधित कृषि उत्पन्न बाजार समितीकडून प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.

**कृपया लक्षात घ्या की, या योजनेच्या अटी आणि शर्ती वेळोवेळी बदलू शकतात. अर्ज करण्यापूर्वी अधिकृत स्रोतांकडून अद्ययावत माहिती मिळवणे आवश्यक आहे.**



**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ऍंड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क**:**rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क**:**sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862

## आठवणीतील व्यक्तिमत्वे




राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३५६..

# परिवर्तन चळवळीतील गायिका मैनाताई माणिक कोकाटे



गायिका मैनाताई माणिक कोकाटे हे नावं मी चाळीसवर्षापासून ऐकून आहे. साधासरळ, शांत स्वभाव, समोरील व्यक्तीचा आदर करून बोलणे, स्टेजवर सुद्धा प्रतिस्पर्धी गायकाचा सन्मान करून गायन, प्रेक्षकांनी कितीही आग्रह केला तरी आपल्या मूळ प्रबोधन विषयाशी संबंधित गायन आणि जर प्रतिस्पर्धी कलावंतानी गीतगायन मधून काही शाब्दिक खोडसाळपणा केलाचा तर त्यांच्या सवाल जबाबास तेवढच प्रत्युत्तर आपल्या शेरोशायरी गीतातून देणारी गायिका. समोरील कलावंत नवखा असेल तर त्यांना संभाळून घेणारं, नवोदित गायक कलावंत बंधूंना कार्यक्रम देऊन त्यांना प्रोत्साहन देण्यास या उभयतांनी कधी माघार घेतली नाही. आपल्या कलावंत बंधूस आपणच पुढे आणले पाहिजे हा मनाचा उदारपणा त्यांच्या ठायी आहे. माझ्या वैयक्तिक कला जीवनात काही कलावंत बंधू भगिनी ज्येष्ठ कलावंत यांचं प्रोत्साहन आहे. त्यातीलच ज्येष्ठ लोककलावंत कवी गायक सोपानअण्णा कोकाटे यांच्यासह मैनाताई आणि माणिकजी कोकाटे यां उभयतांच मोलाच सहकार्य, प्रोत्साहन आहे.

नुसती गुणवत्ता असून कामाची नाही त्या गुणवत्तेला प्रोत्साहन देऊन सहकार्य करणारे मार्गदर्शक असले की उत्साह वाढतो. कोकाटे उभयतांनी स्टेजवर आणि कॅसेट, सी. डी, त माझ्या गीतांना स्थान दिले. माझी गाणी महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यात वाडीवस्तीत पोहचवली."आदर्श गावं करायचं"या कॅसेट सी. डी माध्यम मधून स्वच्छतेचा , निर्मलग्राम योजना, शिक्षणं, पर्यावरण याचा प्रसार प्रचार केला.शासनदरबारी, शाळा महाविद्यालय मधून



*लोकशाहीर विठ्ठल उमप आणि मैनाताई कोकाटे या माझ्या स्वरचित गीतांच्या "आदर्श गावं करायचं" सी. डी त गीत गायन करताना , सोबत मी गीत वाचून दाखविताना*

**"पुस्तक मिळतय, पाटी बी मिळ**
**ऐका सल्ला मोलाचा**
**नाय घरात ठेवायचा बाळू शाळेत धाडायचा"**

"वाचन लेखन आले पाहिजे, जो तो साक्षर झाला पाहिजे," "शौचालय बांधायचं नाय उघड्यावर बसायचं"

आंतरराष्ट्रीय किर्तीचे लोकशाहीर विठ्ठलजी उमप आणि मैनाताईनी गायलेलं त्याचं कॅसेट मधील

**"झालं ओसाड माळरान**
**आता कळाया लागलं**
**पाणी पाणी करून शेत सुकाया लागलं."**

माणिकजीचे धाकटे बंधू फुलचंदजी कोकाटे यांनी यातील सर्व गीतांना एका दिवसात चाल लावून संगीतबद्द केली. ती सर्व गाणी सर्वत्र गाजली. 'क्रांतिकारी भीमवाडी' ,'इतिहासाचे बोले पान, "भिमाई रमाई" आणि अशा अनेक कॅसेटमध्ये गाणी गायली,

**"परदेशाला पती असताना**
**देऊनी साथ श्रमान फुलविला संसार भीमाचा रमान"**

हे मी लिहिलेलं गीत गेली पंचवीस वर्ष सर्वत्र गाजत आहे. दुसऱ्याला सहकार्य करतांना या उभयतांनी आपल्या वेळेची, श्रमाची, कुटुंबाचा विचार केला नाही. कार्यक्रमाच मानधनासाठी कधी कुणाची अडवणूक केली नाही. ठरल्या पेक्षा कमी मानधन दिलं म्हणून वाद केला नाही. अनेक कार्यक्रम नफ्या पेक्षा तोटा झाला. पण त्यांनी आयोजक, संयोजक आणि साथीदार यांना दाखविले नाही, या अशा अनेक प्रसंगाचा गेली पंचवीस वर्ष मी साक्षीदार आहे. जीवनातीलअनेक प्रसंग अडीअडचणी यांना त्या सामोऱ्या गेल्या. आजही त्यांना स्वतःचे चांगले घर नाही, आपले गुरु सोपानअण्णा कोकाटे, साहेबराव कोकाटे, भास्कर कोकाटे मावशी प्रख्यात गायिका चंद्रकला गायकवाड यांचा आणि नात्यातील,सहवासातील अनेक कलावंत बंधू भगिनीचा वारसा नी आदर्श त्यांनी जपला आहे. त्यांना सहकार्य मार्गदर्शन करणाऱ्या शेकडो कलावंतांची नावे त्यांनी मला सांगितली, लिहून कळविली पण लेख मर्यादेमुळे सर्वांचा उल्लेख केलेला नाही. त्यांनी प्रोत्साहन सहकार्य केलेले माझ्या सारखे काही नावारूपास आले याचा त्यांना आनंद वाटतो. प्रल्हाददादा शिंदे, त्यांची सर्व मुलं आनंदजी, मिलिंदजी त्यांचा परिवार, विठ्ठल उमप, विष्णू शिंदे, दत्ता शिंदे,गोविंद गाडेसह कोकणातील नवनीत खरे, जनार्दन धोत्रे असे अनेक जुन्या नवी कलावंत मंडळीच ताईना सहकार्य आणि प्रोत्साहन मिळालं याचाही त्या आवर्जून उल्लेख करतात. मैनाताई यांच्याशी प्रत्यक्ष भेट २००१ झाली. तिथं पासून आजमितीस पंचवीस वर्षे आमचे ऋणानुबंध आहेत . ही दोन्ही उभयता मला आपला भाऊ मानतात. त्यांची मुलं मला आपुलकीन मामा म्हणतात. आम्ही सहकुटुंब मुंबईत गेल्यावर आवर्जून त्यांच्या घरी जातो. त्यांच्या आदरातिथाने आम्ही उभयतां अनेकदा भारावून गेलो आहोत.कैक वेळा चहा नाष्टा, सुग्रास भोजनाचा स्वाद घेतला आहे.छोट्याशा घरात राहून आपल्या चार मुलांचा, नातेवाईक यांचा संभाळ केवळ कलेच्या साह्याने करण अवघड गेली पाच सहा वर्षे कार्यक्रम संख्या कमी झाल्याने हलाखीच जीवन ताईंच्या वाट्याला आलं, आता हक्काच घरं नाही, मोठ्या मुलीचं संगीतच दुखद निधन, मोठ्या मुलाचं आजारानं, यासर्व प्रसंगात जरी धीराने उभे असले तरी, ताई म्हणतात आमच्या सारख्या कलावंतांना शासकिय कोट्यातून हक्काच घरं मिळायला हवं, ते मिळव यासाठी त्यांची धडपड सुरू आहे. त्यांच्या प्रयत्नांना यश यायला हवे. कोकणात चिपळूण गुहागर खेड परिसरात ताईंचा कुठंही कार्यक्रम असला की कोकाटेभाऊ मला फोन करणारं. मी ही उपस्थित राहतो.समाजातील अन्याय, अत्याचार, ऐक्य, बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर , यशोदा, भीमाई, रमाई, सावित्रीमाई याविषयी ताई, गीते सादर करतात, तेव्हा रसिकांना नवी ऊर्जा देण्याचं काम त्या करत असतात. आपल्या समाजातील बहुतांश चळवळीतील सर्व नेत्यांच्या सभेत गेली चाळीस वर्ष गीते सादर करत आहेत. सर्वांनी त्यांचं कौतुक केलं आहे.महाराष्ट्रातील शेकडो कवी गायक गायिका ताईंचा आणि ताई त्यांचा आदर करतात. ताईंच्या घरी गेल्यावर त्या स्वतः हार्मोनियम काढणार, सोपान अण्णा, मी, फुलचंद, माणिकभाऊ, त्यांची मुलं मग आमची जी मैफिली रंगवायची त्यात दोन तीन वेळा चहा नाष्टा व्हायचा. नवीन गाण, कॅसेट, यांवर चर्चा केल्या आहेत. कलावंत शब्दाचा नी कौतुकाचा भुकेला असतो. तो या सर्वात आपल दैन्य दुःख विसरतो. ताई त्यातील एक आहेत.स्वाभिमानाने जगणं, स्पष्ट बोलणं, दुसऱ्याच कौतुक करून प्रोत्साहन देणं हे त्यांच्या कडून शिकावं हजारात गाणी गाणाऱ्या ताईना आर्थिक लाभ मात्र मिळाला नाही. माहेरचे नावं मैना पांडुरंग लक्ष्मण बनसोडे मुक्काम सोन हिवरा, ता. परळी, जिल्हा बीड, आई जिजाबाई, भाऊ जिजाराम, लक्ष्मण, जालिंदर, बंडु, चार भाऊ, आईवडिलांनी मोलमजुरी काबाड कष्ट करून पाच मुलांना वाढविले, शिक्षणं देणं परिस्थितीमुळे जमलं नाही. तो काळ तसाच होता. तत्कालिन परिस्थिती, रिवाजाप्रमाणे ताईचे लग्न अल्पवयात माणिकजी कोकाटे सोबत फेब्रुवारी १९७८ला. झाले, सासर मुक्काम पळस खेड, तालुका केज जिल्हा बीड, संगीता, सुजाता, सरिता, समाधान, आदर्श ही मूल, त्यांनी ही आईचा कलेचा वारसा घेतला आहे.सुजाता, सरिता, आदर्श उत्तम गातो, आदर्श उत्तम संगीत ,वाद्य साथ, कोरस करतो.कोकाटे परिवार कलावंत, त्यांच्या सहवासात सोपान कोकाटे यांनी मार्गदर्शन केले कलेतील ते पहिले गुरू आहेत. अशिक्षित मैनाताई गाण कस वाचतात, गातात हा गंमतीशीर विषय आहे. कुण्या कवीने जरी मोठ्या अक्षरात गाणे टाईप करून दिले तरी ताईंना वाचता येतं नाही. मग माणिकजी त्यांच्या अक्षरात कागदावर लिहितात त्यानंतर त्या बरोबर गातात . ताईंही स्वतः गीतलेखन करतात.हार्मोनियम वाजवून गाण गाणे तसं कठीण कामं पण गेली पंचेचाळीस वर्ष त्या गात आहेत.१९८०पासून फूटपाथवर , रेल्वे स्टेशनवर, सार्वजनिक ठिकाणी प्रेक्षकांना गीते ऐकविले, पन्नास पैसे दोन, पाच ते हल्ली दहा रुपया पर्यंत सोपान कोकाटे, माणिक कोकाटे माझ्या सारख्या इतर कवींची गाणी घेऊन छोटी पुस्तक छापली, शेकडो कॅसेट, सी डी त व्हिसिडीत गायन केले आहे. गाणी रेकॉर्ड कशी होतात, त्यातलं, संगीत, ट्रॅक, वादन या सर्वांची माहिती या उभयतांनी मला दिली आहे.

कलावंतांच्या न्याय हक्कासाठी झटणाऱ्या बौद्ध संगीत कला अकादमी, भारतीय साहित्य कला अकादमी, सम्यक कोकण कला मंच, परिवर्तन कला महासंघ, ऐक्यवादी एकता कला मंच, ऑल इंडिया कला अकादमी या संस्थेत वामन दादा कर्डक हरेंद्र जाधव, ई एन निकम, विष्णू शिंदे, दत्ता शिंदे, बी. टी कदम, मंदार कवाडे, नानासाहेब इंदिसे आणि केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले साहेब. यांचं प्रोत्साहन सहकार्य मिळाल्याचं ते सांगतात. कलावंतांची, शासन, समाजांनी कदर करावी, दखल घ्यावी. आज पर्यंत समाजाने आम्हाला तारले आहे. यापुढेही तारावे ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आपली आई जात्यावर छान ओव्या गायची त्यात ती आवर्जून

**"बंधू र शिपाया तू दे रे दे रुपया हे आणि अनेक गीत छान गायची, मला तिथूनच खरी ओढ होती. सासरच्यांनी हे अचूक ओळखून साथ प्रोत्साहन दिलं. आपल्या जीवनाच सोने झालं, शिक्षण नाही त्यामुळे नोकरी नाही.मी अखेर पर्यंत गात राहणार म्हणाल्या. त्यांची गाणी नी वाणी अशी बहरत जावो. हीच मंगल कामना.**

# आरेकरवाडीतलो हनुमान

## मालवणी बोली



वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.

आमच्या गावात तसा हनुमानाचा प्रशस्त किंवा मोठा, पुरातन मंदिर नाय. पण आरेकरवाडीतल्या महापुरुषाच्या पिंपळाखालचा हनुमानाचा देवस्थान जागृत आसा. फार पुर्वी कोणीतरी मोठया जांभ्या दगडात कोरलेलो हनुमान मस्त देखणो आसा. पुर्वी एका दगडी चौथऱ्यावर बसवलेल्या हनुमानाची प्रतिष्ठापना आता थयसरच एका छोट्या मंदिरात केली आसा. आरेकरवाडीतना पुढे दादा दुकानदार, भाताची व पिठाची गिरण, पोष्ट ऑफीस, लेले, मेहेंदळे वगैरेंकडे आमची दररोजची कामा असायची. बागवेवाडीकडे जाणारो रस्तो अगदी ह्या हनुमानाच्या देवस्थानाजवळूनच जाता. रस्त्यान जाणारो येणारो प्रत्येक जण हनुमानासमोर नतमस्तक होवनच पुढे जाता. दर शनिवारी गावातले अनेक मारुतीभक्त हनुमानाची रुईच्या पानांचो हार नि पिकलेला केळा अर्पण करतत. पुर्वी थयसून जातना मी रस्त्यावरसून नमस्कार करता करता बारीक डोळ्यांनी हनुमानाच्या पुढ्यात कोणी काय ठेवल्यान आसा काय बघायची. एक दोन केळी दिसली की आयेक सांगायचा, तू हो पुढे, मी मारुतीचक जवळसून पाया पडान येतय. मारुतीसमोरच्या केळ्याक, खिरापतीक मुंगळे डसलले असले तरी केळा झटकून खायची. देवासमोरच्या अशा प्रत्येक पदार्थाची चव काय अद्भुतच लागता.

हनुमानाच्या देवस्थानापासून अगदी थोड्या अंतरावर आरेकरांची स्मशानभूमी आसा. स्मशानभूमीचो तेवढो परिसर मात्र चिनभिन वाटता. तेच्यातच कोणी मरतिक जळत असला तर मगे लयच भय वाटता. जवळपास कोणाचा घर नाय, जागजूग नाय. कातरवेळेक रस्त्यान चलतना थयली एखादी झाळ जरी हलली ना, तरी अंगावर सर्रकन काटो उभो ऱ्हवता. आताच्या काळात तशी कोण स्मशानाक, मर्तिकाक घाबारनत नाय. पण पुर्वी आम्ही ल्हान असतना लय भीती वाटायची. असो भय वाटलो की मग हनुमानाचा नाव घ्यायचा, जप सुरु करायचो, हनुमानाचो धावो करायचो ह्या आमचा ठरलेला गणित. सांचेक कातरवेळे तेवढ्या परिसरात ह्या मारुतीचो लय मोठो आधार वाटता आमका. अगदीच कोण नसलो तरी आपलो हनुमान आपल्या सोबत आसा नि तो माका भिया नको सांगता एवढी आमची ह्या हनुमानावर श्रद्धा.दरवरसाक आरेकारी हनुमान जन्मोत्सव साजरो करतत. अगदी पुर्वीपासून बघतय, ह्या दिवशी श्री सत्यनारायण महापूजा, आरती, भजना, डबलबारी, कधी एखाद्या वर्षी वाडकऱ्यांनी बसवलला दोन अंकी नाटक, कधी दशावतार नाटक असे हयचे कार्यक्रम असतत. पुर्वी तर हनुमान जन्मोत्सवानिमित्त नंद्याचे पडद्यावरचे सिनेमे पण दाखवायचे. संपूर्ण आरेकरवाडी एकत्र येवन हनुमान जन्मोत्सवाचो कार्यक्रम दरवर्षी साजरो करतत. शिवाय सगळो गाव झाडान ह्या कार्यक्रमांसाठी जाता. लय मजा येता. आनंद व्हता. सण काय येतत नि जातत. पण पुढची वर्षभराची एनर्जी देवन जातत. आजय कधी गावाक गेल्यावर त्या रस्त्यान चलतना आरेकरवाडीच्या हनुमानासमोर पावला आपोआपच थांबतत. हनुमानाक मनोभावे नमस्कार करतय आणि मगच पुढे जातय.

# रायवळ म्हंजे ?

प्रा. के. एस. शिरबंदे,
दापोली

सोलापूर सारख्या पावसासाठी आसुसल्या शहरात आम्हां भावंडांचं बाल्य गुजरलं. काळ्या मातीच्या कृपेने चवदार जोंधळा सोडून कुठल्या पिकाचं नावही माहीत नसावं असा तो भूतकाळ! हल्ली जरा पाटबंधारे आणि धरणांमुळे जर पाण्याची चंगळ आणि जराशी हिरवळ झाली असेल तर ठाऊक नाही पण ५० वर्षांपूर्वी तर तो दुष्काळी प्रदेशच होता. त्यामुळे फळभाज्या, पालेभाज्या, फळे, फुले या गोष्टी चुकूनच मिळायच्या. त्यामुळे उन्हाळ्यात देशी इवले इवले आंबे मिळायचे. ते रायवळ होते का ? किंवा वेगळ्या प्रजातीचे काही कल्पना नाही.

मध्यंतरी नवाजलेले रत्नागिरी हापूस आणि आता देवगड हापूस प्रमाणे बिचारे गरीब रायवळ आंबे कोकणातून सोलापूरला निर्यात होत होते कि नाही कल्पना नाही बहुशः नसावेत. तरी खानदानी सोलापूरकराला विचारलं तर ही माहिती उपलब्ध असेल देखील. तरी नशीब लोणच्याच्या कैऱ्या मात्र महाग असल्या तरी मे अखेरीस मिळायच्या. त्यामुळे आईच्या हातच्या कैरीच्या लोणचं, गुळंबा, साखरंबा हे पदार्थ साठवले जायचे. लोणचं वर्षभर तर गोड पदार्थ २-३ महीने ताटात अधूनमधून दिसायचे. कधी कधी मुद्दाम पायरी आंबा आणला कि आमरस +चपाती / पुरी / पुरणपोळीचा विशेष कार्यक्रम व्हायचा. खास करून पोर्णिमा-अमावास्या आणि सणांच्या दिवशी. चैत्रात मात्र कैरीचं कोशिंबीर + पन्हं हाजरी लावत असत.ण तोक्कू, काप, आंब्यांची पोळी, कन्नडमध्ये ज्याला पळू किंवा गोज्जू म्हणतात आंबट तिखट तोंडलावण जे भाकरी, चपाती, भात तिन्हीं बरोबर स्वादिष्ट लागायचं आणि कधी भाजी, आमटीनं रजा घेतली अथवा अचानक अतिथी आले तर बदली कामगार म्हणून जेवणात हजरी लावायचे आणि गृहिणीच्या वाट्याला संकटमोचक ठरायचे, हे सर्व पदार्थ मी हुबळी कर्नाटकमध्ये राहायला आल्यावर चाखले.

बेळगावीहून रत्नागिरी हापूसची लाकडी एअर कंडिशन्ड पेटी दिमाखात पाहुणी बनून गृहप्रवेश करायची .मग मुलामुलींना १ फोडी / १फोड + कोयरी अशी ठराविक विभागणी व्हायची आणि बालचमूही हट्टाच्या भानगडीत न पडता त्या दोन फोडी सानंदे खायचे आणि गुठली मस्त चोखून, आणि रस ओघळला तर कोपरापर्यंत चाटून एकही थेंब वाया न घालवता गोडीनं खात. कोणालाही ते चुकीचं / अनारोग्यकारक वाटायचं नाही.



मध्यंतरी माझ्या गुरूस्थानी असलेल्या सर्जन + स्त्रीरोगतज्ञ नवराबायकोंच्या घरी मी आंबा खाण्याची नवीन पध्दत नवलाईनं पाहिली. आंबा आडवा कोईपर्यंत खोल चिरायचा आणि हळूवारपणे त्या गोल गरगरीत फोडी वेगळ्या करायच्या. एकीच्या नशीबी अख्खी कोय असायची अणि दुसरीच्या नशीबात खड्डा. मग चमच्यानं आईस्क्रिमप्रमाणे हळूहळू आंबा खायचा. मला वाटलं मी लंडन ब्रिजच्या शेजारच्या 5स्टार फ्रुट सेंटरमध्ये भारतातून आयात केलेला mango fruit खात आहे ! मग मला खूप उशीरा कळलं कि आंब्याच्या अनेक प्रजाती आहेत. लंगडा, तोतापुरी /गोवा, केसरी इत्यादी इत्यादी.

पण तरीही आंब्यांच्या विषयी मला किती कमी माहीत आहे? याचा ज्ञानोदय मला काल झाला. विषय पाहून. तेव्हां मला कठीण प्रश्न पडला, " ये रायवळ रायवळ क्या है ? ये रायवळ रायवळ ? " मी कधीच माझा लेख कागदावर उतरवायच्या आधी

मी कधीच माझा लेख कागदावर उतरवायच्या आधी इतरांचे लेख वा कविता वाचत नाही. उगाच त्या सावलीत काय वावरायचं ? पण आज मला मुद्दाम जाणिवपूर्क लेख वाचावा लागला तेव्हां समजलं, रायवळ कशाशी खातात राव ! आणि फक्त रायवळच नव्हे तर अनेक प्रकारचे आंबे रायवळ, गोडा, बाटली साखर, मलगोबी, राजापूरी देवा देवा ही आंब्याची नावं आहेत कि नकाशातली गावं ? कोंकणवासियों, तुमका गोत नसा तुमी किती भाग्यवान !


आता मी बेळगावीमध्ये विश्रांत जीवन जगते आहे आणि मला ऐकून खूप वाईट वाटलं कि एके काळी बेळगावीचा हापुस ही प्रजाती पण होती. ती रत्नागिरी / देवगड इतकी मधूर होती कि नाही अथवा त्यांच्यापेक्षा सरस सुमधुर होती काहीच ठाऊक नाही. तरी पण मला खूप वाईट वाटलं, अर्थाअर्थी संबंध नसतानाही. ना मी तो पाहिला आहे, नाचाखला आहे.

**तरीपण असं वाटून गेलं कि माझ्या खिजगणतीत नसलेल्या माझ्या दूरच्या मामांचा खूप वर्षांपूर्वीच वंश निर्वंश होऊन गेला आणि वाटलं कि १ प्रार्थना करावी बेळगावीच्या हापुस आंब्या रे, तुला चिरशांती लाभो!**

# माझा विमानातील पहिला प्रवास.



**विलास भि. कोळी**



आपल्या आयुष्यात काही क्षण असे असतात, जे काळाच्या ओघात मनात खोलवर कोरले जातात. लहानपणापासूनच मला विमान प्रवासाची प्रचंड उत्सुकता होती. पण ती पूर्ण होत नव्हती. आकाशात झेपावणाऱ्या विमानांकडे बघताना मनात नेहमी एकच विचार डोकावत असे."कधी मीही यामध्ये बसेन?" आणि अखेर ती बहुप्रतिक्षित संधी समोर आली. ऑफिसच्या कामानिमित्त दिल्लीला जाण्याचा योग आला. ती इच्छा श्री. स्वामीच्या कृपेने पूर्ण झाली. माझ्यासाठी विमानातील पहिला प्रवास हा असा एक अविस्मरणीय क्षण ठरला.

**प्रवासाची तयारी – एका कार्यक्रमासारखी धावपळ.....**

जशी प्रवासाची तारीख जवळ येत होती, तसतसा उत्साह शिगेला पोहोचला होता. सकाळी ७.३० वाजता पुणे विमान तळावरून दिल्लीला उड्डाण होतं, त्यामुळे घरात पहाटे पासूनच बॅग भरण्यासाठी गडबड गोंधळ सुरू झाला होता ! बॅग पॅक करताना सौ.बाईंच्या व मुलींच्या सूचना अंगावर कोसळत होत्या "फोटो पाठवा, लाईव्ह लोकेशन शेअर करा, बाबा विमानाजवळ उभं राहून सेल्फी काढा, आकाशातील ढगांचे फोटो पाठवा, आणि हो, कानात कापूस घालायला विसरू नका बरं का, हा सौ चा आदेश !"

ऑफिस मधील सहकार्यांनी खास नवीन बॅग घेण्यासाठी केलेली धडपड, बॅग उघडून कुठल्या कप्प्यात काय ठेवायचे यांची आत्मीयतेने सांगितलेली माहिती, बॅग आवडली का म्हणून हळूच विचारलेला प्रश्न. बॅग आणल्यानंतर आमचे जेष्ठ सहकारी यांनी प्रवासात बॅग गहाळ होऊ नये म्हणून त्यावर लिहलेलं मोठ्या अक्षरातील माझं नावं. आणि त्यांनी विमान प्रवास केला असल्यामुळे त्यांनी सांगितलेल्या विमानातील आठवणी, अशा वेगवेगळ्या माध्यमातून सहकाऱ्यांकडून मिळालेल्या शुभेच्छा. हे सारे क्षण माझ्या आठवणीत अजूनही ताजे आहेत.

**स्वप्नांच्या ढगात......**

विमानतळावर पोहोचल्यावर सुरक्षा तपासणी आणि बोर्डिंगच्या प्रक्रियेतून पहिल्यांदाच गेलो. प्रथमच विमानात बसताना मनात एक वेगळीच उत्सुकता आणि थोडीशी भीतीही होती. विमानात पाऊल टाकताना थोडीशी धडधड होती, विमानातील कर्मचारी अतिशय विनम्र होते, त्यांनी आदरयुक्त स्वागत केले, सर्व माहिती नीट सजावून सांगितली जसे बेल्ट कसा लावावा, मास्क कोठे आहेत, मध्येच विमानात काही अडचण आली तर काय करायचे असे बरेच काही. आमचा प्रवास आरामदायी होईल याची काळजी घेतली. विमान धावपट्टीवर सुरु झाल. हळूहळू विमान धावपट्टीवर वेग घेत होते आणि माझी उत्सुकता काही क्षणातच थरारात बदलली. एका क्षणात विमान आकाशात झेपावलं आणि पोटात धस्स झाले. खिडकीतून बाहेर बघतो तर काय शहरं झपाट्याने मागे पडत होती, ढगांतून वाट काढणं, वरून दिसणारी हिरवीगार शेतं, डोंगर, दऱ्या, नद्या, नाले, बिल्डिंग हे दृश्य जणू एखाद्या सिनेमात बघितल्या सारखे वाटत होतं. मनात नकळत शब्द उमटले "हेच तर पाहायचं होतं !" "हेच अनुभवायचं होत."

**दिल्लीदर्शन आणि परतीचा प्रवास......**

दिल्लीच्या हवेत उतरताना मनात हुरहूर होती. दिल्ली विमानतळा वरचं दृश्य अगदी एखाद्या एस.टी. स्टँड सारखं वाटत होतं. इथे फरक एवढाच होता, इथे लाल-पिवळ्या एस.टी. बसांच्या ऐवजी, आकाशात झेपावणाऱ्या विविध एअरलाईन्सच्या भव्य विमानांची रांग लागलेली होती. कोणाचं विमान थोडं रंगीत, कोणाचं चमचमीत; कुणाचं नाव लांबूनच दिसावं असं मोठ्या अक्षरात रंगवलेलं,जणू एखाद्या महामंडळाच्या आगारात उत्सव सुरू असावा असे. !

एका टर्मिनलवर इंडिगो उभं, दुसऱ्या टर्मिनलवर विस्तारा शांतपणे थांबलेलं, तर थोडं लांब एअर इंडिया त्याच्या राजेशाही थाटात उभं. प्रत्येक जण आपली वेळ यायची वाट बघत शांतपणे वाट पाहत होतं. एकंदरीत, दिल्ली विमानतळ म्हणजे आकाशमार्गाच्या प्रवासासाठीचं 'राज्य परिवहन मंडळ', फक्त इथे सिट बेल्ट घालावा लागतो, दिल्ली विमानतळावर पाऊल ठेवलं आणि वाटलं, "अरेच्चा! मी खरंच एअरपोर्टवर आलोय की एखाद्या मोठ्या एस.टी. स्टँडवर?" फरक फक्त एवढाच होता की इथे खाकी गणवेशातले ड्रायव्हर नव्हते, पण सुटाबुटातले पायलट एव्हिएशन ड्रायव्हर' होते ! प्रत्येक विमानाच्या पुढे 'बोर्डिंग'च्या गेटवर माणसांची रांग, जणू पुणे डेपो मधल्या 6 वाजेच्या बसची चढाई सुरू आहे ! हे सारं बघताना वाटलं, "अरे आपलं आयुष्यसुद्धा अशाच टर्मिनलवर उभं आहे. प्रत्येक स्वप्नं एक विमान आहे, आपली इच्छा तिकीट आहे, आणि वेळ झाली की आपल्याला झेप घ्यायची आहे !"

दिल्ली विमानतळावरून बाहेर पडलो, दिल्लीतील स्वच्छता, टापटीप, हिरवीगार झाडे पाहून मन हरकून गेले. दिवसभरातील ऑफिसचे काम पार पाडले. रात्री ८ वाजता परतीचं विमान होतं. दिल्लीच्या गजबजलेल्या रस्त्यांवरून विमानतळाकडे जाताना दिवसभराच्या आठवणी मनात वावरत होत्या. आमच्या बरोबर दिल्लीतील असलेल्या चालकाने ही आम्हाला व्यवस्थित वेळेच्या अगोदर विमानतळावर पोहोचवले. विमानतळावर पोहोचल्यावर सुरक्षा तपासणी आणि बोर्डिंगच्या प्रक्रियेतून गेलो आणि सुरु झाला परतीचा प्रवास, रात्रीच्या अंधारात आकाशातून दिसणारी दिव्यांची चकाकी, रात्रीच्या वेळी लाइटिंग मध्ये गावे/ शहरे तर अगदी छोटी छोटी आणि मनोरंजनीय दिसत होती. जणू दिवाळीचा आकाशात उतरलेले स्वप्नच! त्या क्षणी वाटलं – "हे दृश्यप्रत्येकाने एकदा तरी अनुभवायलाच हवं!" हा प्रवास अगदी अंतिम टप्प्यात आला होता. आणि अचानक विमान हेलकावे घेऊ लागले. दर दर दर दर आवाज यायला लागला.

त्यामुळे विमानात एकच गोंधळ उडाला. सगळे प्रवासी एकमेकांकडे बघू लागले, मी ही घाबरून गेलो. मनात श्री. स्वामींचा जप चालू केला. त्यावेळची सुचवेशन लक्षात घेऊन हवाई सुंदरी नी दिलासा देण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर काही वेळातच सर्व पूर्ववत झाले. मी उत्सुकतेपोटी त्या हवाई ताईंशी विचारणा केली हे असं काय झाले , त्यावेळी त्यांनी सांगितले की, आकाशातील वाऱ्याचा जोरदार लोट आल्यामुळे विमान अचानक वर खाली होते.

हा संपूर्ण प्रवास अविस्मरणीय होता. पहिल्यांदा पक्ष्यांसारखे आकाशात झेपावण्याचा अनुभव मला खूप आनंददायी आणि रोमांचक वाटला. हा प्रवास म्हणजे केवळ विमान प्रवास नव्हता, तर एक स्वप्न प्रत्यक्षात उतरण्याचा अनुभव होता. त्याचवेळी आठवलं... गेल्या वर्षभरात 'जाणता राजा' महानाट्याच्या बिलाच्या मूळ प्रति आणण्यासाठी मला महाराष्ट्रातील तब्बल १८जिल्ह्यांत फिरण्याची संधी मिळाली, शिवाय मी लिहलेल्या 'वाडा' पुस्तकाच्या चीकीत्स्क अभ्यासासाठी १२ जिल्ह्यांत मी प्रवास केला होता. एकूण ३० जिल्ह्यांचा प्रवास करताना त्या भूमीचा सुगंध, माणसांची उब, आणि निसर्गाचा मोहकपणा याचं सुंदर मिश्रण अनुभवता आलं. प्रत्येक प्रवासात काहीतरी शिकायला मिळतं – नवी माणसं, नवे अनुभव, आणि नव्या स्वप्नांच्या वाटा. हेच तर आयुष्याचं खरं सौंदर्य आहे.

म्हणून माणसाने एकदा तरी विमान प्रवास करावा.











# आंबा पिकतो...!

**चित्रा नानिवडेकर, पालघर.**

चैत्र लागला की आंब्याच्या मोहराचा घमघमाट आसमंत दरवळून टाकतो. आणि दोन गोष्टींचे वेध लागतात. एक म्हणजे आजोळी जाऊन चैत्र गौरीचे हळदीकुंकू आणि माजघराच्या कोपऱ्यात लावलेली आंब्याची पेढी.

अगदी सक्काळी उठून विहिरीवर अंघोळ झाली की अख्ख्या वाड्यात पार कानाकोपऱ्यात फिरून पडलेल्या कैऱ्या गोळा करायच्या...त्याची आंबोशी, पन्ह, टक्कू, मेथांबा, गुळाम्बा ही रूपं आई, मामी आणि आजी करायची आमचं काम फक्त खादाडकी करायचं...एव्हाना बाळ कैऱ्या जाऊन बाठ झालेली असायची त्याच्या फोडी करून तिखट, मीठ लावून चटक मटक खाणे हे ठरलेलं.

आजी बरोबर तुळशीवृंदावन समोर चैत्रांगण रेखाटताना आजूबाजूला लुडबुड करणं. हळदी कुंकवा दिवशी देवीची आरास करताना आजी देवीचे ठेवणीतले दागिने, साज काढून देत असे. मग आम्ही भावंड डेकोरेशन मध्ये मध्ये आरसा त्याच्या बाजूने समुद्रातली रेती टाकून तळ करत असू, देवीचा करंडा, तिला खणाचा परकर पोलका असा साज करत असू. मग मोर्चा मामी आणि आई वाटत असलेल्या आंबे डाळीकडे. नंतर मोठ्ठ्या स्टील च्या पिंपात बनवलेलं पन्ह. आजी, मामी च्या मैत्रिणी ठेवणीतले दागिने, मोगऱ्याचे गजरे वगैरे माळून हळदी कुंकवाला येऊ लागत. त्यांना पळसाच्या पानावर आंबेडाळ आणि पेल्यात पन्ह देण्याचं काम हौसेन करायचं.

यथावकाश आजोबा शेतावरिल लखमणला बोलावून दारचा पायरी उतरवून घेत असत. आमच्या अंगणात आंब्याला माझ्या आजोबांनी नावं दिली होती. उषा आंबा, प्रभावती आंबा...कारण त्यांच्या कडून तो लावला असायचा.दारी रायवळ, लंगडा, बाटली आंबा अशी झाडं होती खेरीज आम्हा मुलांना साखर आंबा म्हणून बिटूकला आंबा राखून ठेवला असायचा...त्या आंब्या चा आंबा आम्ही मुलं एकेका वेळी दहा तरी फस्त करीत असू. देठ तोडून चोखून खायचा. पुढे आयुष्यात फ्रुटी आली पण त्या आंब्याची सर कधीच कोणत्या पेयाला येणार नाही.

केशर आंबा शेतावरून आमच्यासाठी दुसरे आजोबा घेऊन येत असत. मग काय आमरस आणि पोळी...त्यावर साजूक तुपाची धार.. पंचपकवान्न त्यापुढे झक मारेल. आम्हाला हापूस आंबा खूप नंतर समजला तोपर्यंत आमचं पोषण परिसरातील रायवळ, मलगोबी, राजापूरी हया आंब्यावर झालं होतं.

मुंबई चे पाहूणे येताना एखादी रत्नागिरी हापूस ची पेटी आणायचे आणि स्वयंपाक घरात चर्चा रंगायची 'अहा.. काय सोनेरी रंग, चव काय सुंदर मुलांनो बाठ, सालं खायला या खूप गोड आहे हा आंबा आणि हो महाग सुद्धा ' यथावकाश शहरात आल्यावर आंब्याचा सिझन म्हणजे फक्त हापूस चा हे समीकरण ठरलेलं जणू. मैत्रीण मालवण वरून आंब्याची पेटी आली की आम्हा मैत्रीणीना एक दिवस आंबे खायला बोलवायची. आधी आंबा हातात घेऊन त्याचा सुगंध श्वासात भरून घ्यायचा, नंतर त्याचा मोहक पिवळा रंग डोळ्यात साठवून घ्यायचा. नंतर हळुवार नजाकतीने त्याच्या फोडी करून प्लेट मध्ये ठेवायच्या...काय नेत्रसुखद दृश्य ते.

.... आणि एकदा अचानक एका मैत्रणीने देवगडी हापूस देताना म्हटलं "आमच्या दारचे देवगडचे आंबे "अहाहा... मुलगी तर त्या आंब्याच्या प्रेमातच पडली...काय ती चव, रस काढला की किचन त्या सुवासाने दरवळत नुसते ठेवले तरी घरभर घमघमाट. आता प्रत्येक वर्षी केवळ देवगडी हापूस. मी आमच्या लहानपणी आम्ही कोणते आंबे खायचो ते सांगायला सुरवात केली की नवलाने पहात म्हणे... रायवळ? हे काय असतं?"परग्रहावरून आणलेलं कोणतं अजब फळ असल्या सारखं तोंड करून हापूस आंबा घेऊन प्लेट मध्ये कापून खात असे. मी मात्र रायवळची पेढी डोळ्यासमोर येऊन ते बालपण आठवत असे. तिचं सुद्धा खरं असेल.. कदाचित...कारण त्यांच्यापुढे ते गावचं घर नाही, कोकीळ कुंज करणारी कोकिळा नाही...ती झाडावर लघडलेली फळं नाहीत,आमराईत फेरफटका मारून पक्षाने अर्ध फळ खाल्लं की ते जास्त गोड आहे हे सांगणारे आजोबा नाहीत.सगळ्यात महत्वाचे म्हणजे त्यांना वेळ नाही. त्यांना फक्त वेध असतात की कधी सिझन सुरू होतो आणि आम्ही कधी पेटी बुक करतो.

पण महाराजा आंबा हा असा पेटीतून काढला आणि खाल्ला इतका स्वस्त नाही. तो रंग, रूप गंध ह्याने आधी पिऊन घायचा आणि तीन महिने आडवा हात मारून खायचा...तेंव्हाच खरी जिव्हा तृप्ती होते. अखेर तो फळांचा राजा आहे!



**फ र क शो धा**

# रायवळ आंब्याच्या आठवणी......

**दीपक गुंडये, मुंबई**

हल्ली जानेवारी महिना उजाडतानाच हापूस आंब्याची पहिली पेटी कोकणातून रवाना झाल्याची बातमी येते. हापूस आंबा एवढा जगप्रसिद्ध झाला आहे की तो विकत घेणे आणि चवीने खाणे हासुद्धा एक स्टेटसचा भाग झाला आहे. हापूसच्या प्रसिद्धीमुळे त्याचे मूळ असलेला रायवळी आंबा मात्र तितकाच चवदार असूनही प्रसिद्धीत मागे पडत गेला आणि एखाद्या नावडत्या भावंडाप्रमाणे दुर्लक्षिला गेला. पण कोकणी माणूस मात्र आंब्यात डावे उजवे करत नाही. हापूस आंब्यासारखाच रायवळी आंबाही तो तितक्याच चवीने खातो. याच रायवळी आंब्याच्या काही आठवणी मनात अजूनही घर करुन आहेत.

कोकणात रायवळी आंब्याच्या बहराचा महिना एप्रिल-मे असला तरी मुंबईत काही आंब्याची झाडे अशीही आहेत की जी नोव्हेंबर-डिसेंबरमध्येच मोहोरतात आणि कैऱ्यांनी लगडतात. आंब्याचा हा बहर पाहताच मे महिन्याच्या उन्हाळी सुट्टीतील कोकणातील बालपण हमखास आठवते आणि सोबत जाग्या होतात त्या रायवळ आंब्याच्या आठवणी. उन्हाळी सुट्टीत गावी गेल्यानंतर कोकणचा रानमेवा चाखणे हा एककलमी कार्यक्रम असे. बोरं, करवंद, तोरणे, जांभळे यासोबतच महत्त्वाचा रानमेवा असे तो रायवळी आंबा. आमच्या नडगिवे गावी कोकणातील इतर गावांसारखेच विविध प्रकारचे, आकाराचे, चवीचे आंबे मिळायचे, अजूनही काही प्रमाणात मिळतात. आंब्याचे विविध प्रकार गावी चाखायला मिळतात. खोबऱ्यासारखा लागणारा खोबरा आंबा, मिरमिरीत चव असणारा मिरमिट्या, आकाराने लहान म्हणून बिटकी, तसाच आकाराने मोठा म्हणून धोंधया, रसातून चिक लागणारा चिकयारा असे वेगवेगळे आंबे गावी मिळतात.

घराच्या समोरच्या बाजूलाच असणारा आंबा मे महिन्यात पिकायला लागला की सकाळी लवकर उठून फेरी मारली की पिकून पडलेले आंबे मिळायचे. दिवसभरातही अधूनमधून गेल्यानंतर पडलेले आंबे मिळायचे. असे असले तरी झाडावर पिवळा रसरशीत आंबा दिसला की तो दगड मारुन पाडणे व्हायचे. यातही काही नेमबाज असत. आमचे बरेचसे दगड फुकट जात किंवा भलतेच आंबे खाली पडत. परंतु नेमबाजाने मारलेला दगड नेमका तो पिकलेला आंबा घेऊनच खाली येई. थोडे पुढे गेल्यानंतर व्हाळाच्या मधोमध असलेला आंबा आहे. व्हाळात असल्यामुळे त्याला व्हाळयेवरचा आंबा म्हणतात. या आंब्याचे वैशिष्ट्य म्हणजे तो रायवळी असूनही त्याचे फळ मात्र हापूस आंब्यासारखे आहे आणि तो व्यवस्थित कापूनच खावा लागतो. कारण आंब्याच्या कापा प्रकारातील तो आहे.

वाडीच्या विहिरीकडे जाण्याच्या वाटेवर गोवळदेव आहे आणि तिथे असलेला आंबाही मे महिन्यात पिकायला लागल्यावर वाटेवरच पिकलेले आंबे पडत असतात. विहीरीवरुन पाणी भरुन आणताना ते आंबेही निवडून आणले जातात. विहिरीच्या बाजूलाही एक आंबा होता. त्यावरचे आंबे बऱ्याचवेळा विहीरीत पडत असत. त्यावर बांडगुळांनी कब्जा केल्यानंतर मात्र तो वठत गेला आणि चार वर्षापूर्वी पूर्णपणे वठल्यामुळे पडून गेला. रानात तर भरपूर आंब्याची झाडे होती, आहेत. रानात फिरताना ते आंबे गोळा करुन घरी आणले जात आणि नंतर ते खाताना वेगवेगळ्या चवींची सरमिसळ होत असे. हल्ली रानातला वावर कमी झाल्यामुळे पायवाटा बंद झाल्या आहेत. त्यामुळे आंबे गोळा करुन आणण्याची ती मजा परत अनुभवणे कमी झालेय.



## पिस्ता आइस्क्रीम



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

**पिस्ता आइस्क्रीम ही एक स्वादिष्ट आणि पौष्टिक मिठाई आहे, जी घरी सहज तयार करता येते. खाली दिलेली रेसिपी वापरून तुम्ही अगदी बाजारात मिळणाऱ्या क्वालिटीसारखी पिस्ता आइस्क्रीम घरीच बनवू शकता.**

**साहित्य**

- **साखर – १/२ कप (किंवा चवीनुसार)**

**दूधासाठी :**

- फुलक्रीम दूध – १ लिटर
- केशर – काही धागे (२ टेबलस्पून कोमट दुधात भिजवून ठेवलेले)
- पिस्ते - ¼ कप (किसलेले किंवा जाडसर भरड)
- कॉर्नफ्लोअर १ ते १½ चमचा
- मिल्क पावडर २ चमचे (ऐच्छिक पण चव वाढते)
- फ्रेश क्रीम / व्हीपिंग क्रीम ½ कप
- पिस्ता इसेन्स किंवा इलायची पावडर ½ चमचा
- हिरवा फूड कलर २ थेंब (ऐच्छिक)

**कृती:**

- **स्टेप 1**: दूध गरम करून घनदाट करणे
- एका जाड बुडाच्या भांड्यात दूध गरम करत ठेवा.
- ते अर्धे होईपर्यंत मध्यम आचेवर उकळा.
- दूध उकळताना सतत हालवत राहा म्हणजे खाली लागणार नाही.
- **स्टेप 2**: कॉर्नफ्लोअरचे मिश्रण तयार करणे
- एका लहान वाटीत कॉर्नफ्लोअर थोड्या दूधात मिसळा आणि गुठळ्या काढा.
- हे मिश्रण उकळत्या दूधात घालून अजून ५-७ मिनिटे शिजवा.
- मिश्रण घट्ट होऊ लागेल.
- **स्टेप 3**: साखर, पिस्ता आणि इसेन्स
- आता त्यात साखर, मिल्क पावडर आणि पिस्ता घालून ढवळा.
- पिस्ता इसेन्स किंवा इलायची पावडर घाला. रंग हवा असेल तर हिरवा फूड कलर घाला.
- मिश्रण पूर्ण थंड होऊ द्या.
- **स्टेप 4:** फ्रेश क्रीम मिसळणे
- थंड झाल्यावर फ्रेश क्रीम घालून मिक्सरमध्ये २ वेळा फिरवा (किंवा ब्लेंडरने फेटा).
- यामुळे आइस्क्रीम मऊ आणि स्मूद होईल.
- **स्टेप 5**: सेट करणे
- मिश्रण एका एअरटाईट डब्यात ओता.
- झाकण लावून डीप फ्रीजरमध्ये ७-८ तास किंवा रात्रभर सेट होऊ द्या.


**सर्व्ह करताना सजावट**


- वरून थोडेसे किसलेले पिस्ते भुरभुरवा.
- जर चाही असेल तर केसराच्या धाग्यांनी सजवा.



# गतस्मृतींची गजबज- नव्हे, आठवांची गजबज

बाबू घाडीगांवकर,
जालगांव, दापोली.
मो. ९४२१७९५९५५.



उपक्रमशील शिक्षक, प्रथितयश साहित्यिक तथा शाहीर राष्ट्रपाल सावंत यांचे नवे पुस्तक 'गतस्मृतींची गजबज' आज प्रकाशित होत आहे. चिपळूण येथील प्राथमिक शिक्षक पतपेढी सभागृहात अतिशय दिमाखदार समारंभात या पुस्तकाचे प्रकाशन साहित्य, संस्कृती, राजकीय क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांच्या हस्ते होत आहे. या प्रकाशन सोहळ्याचे औचित्य साधून लिहीलेला हा विशेष लेख.

शून्यातून विश्व निर्माण केलेले म्हणण्यापेक्षा स्वतःचे अस्तित्व निर्माण केलेले राष्ट्रपाल सावंत हे एक चारचौघांसारखे मराठी 'शाळा मास्तर'. मात्र 'मास्तर' होईपर्यंत, प्रपंचाचे आणि कारकिर्दीचे बस्तान बसेपर्यंत अनंत यातना, अवमान, हालअपेष्टा सोशीत सोशीत परिस्थितीशी लढलेले, मुकाबला केलेले आणि कधीही हतबल न झालेले 'लढवय्या' शूर वीर! त्यामुळेच बेगडी, अलंकारिक किंवा अतिशयोक्तीचा लवलेशही नसलेले त्यांचे लिखाण नेहमीच नैसर्गिक व स्वाभाविक वाटते.


'गतस्मृतींची गजबज' च्या सुरुवातीलाच राष्ट्रपाल सावंत आवर्जून उल्लेख करतात की, हे पुस्तक म्हणजे आत्मचरित्र नाही. आठवणींचे काही सुटे सुटे तुकडे जोडलेले हे एक निराळेच पुस्तक आहे. कदाचित एखाद्या विशिष्ट साहित्य प्रकारात हे पुस्तक मोडणारही नाही. गतस्मृतींची गजबज हे पुस्तक म्हणजे स्वतः निर्माण केलेल्या पायवाटेने मजेत चालणाऱ्या एका जिंदादिल वाटसरुचा हा कलंदर प्रवास आहे या एकाच वाक्यात या संपूर्ण पुस्तकाचा सारांश सांगता येईल. प्रत्येक माणूस तसे म्हटले तर त्याचे आयुष्य जगत असतो. गतस्मृतींच्या गुंतावळ्यात गुरफटत असतो. मात्र अनेकदा अशा कडू गोड आठवणींना कागदावर लिहीणे अनेकांना शक्य होत नाही. आठवणींचा चक्रव्यूह भेदून जाणे सर्वांनाच जमत नाही. मात्र राष्ट्रपाल सावंत या पुस्तकाच्या माध्यमातून आठवणींच्या कोशातून बाहेर पडण्यात यशस्वी झाले आहेत असे निश्चितपणे सांगता येईल.

आत्मनिवेदन करताना फारच संभाळून व जबाबदारीने लिहावे लागते. एखाद्या शब्दाने कोणी कधी कसा दुखावेल सांगता येत नाही. त्यातही राष्ट्रपाल सावंत पडले एक शाळा मास्तर. या प्राण्याला तर पावलोपावली अशी दक्षता घ्यावी लागते. मात्र संपूर्ण पुस्तक वाचताना असा एकही 'दुखरा' शब्द आढळत नाही हे लेखकाचे फार मोठे कसब आहे. राष्ट्रपाल सावंत जन्मापासूनच अतिशय गरीबीत वाढले. बुद्ध विहारातील भन्तेजींनी त्यांचे नाव 'राष्ट्रपाल' ठेवले खरे, पण त्यांच्या बारशाला ना भावकी, नातेवाईक, ना शेजारी पाजारी. त्यामुळेच आयुष्याच्या पहिल्या क्षणापासून गरीबीशी, परिस्थितीशी झगडावे लागलेल्या प्रत्येक घटनेचे, प्रसंगाचे निवेदन साध्या, सोप्या, सहज मात्र निर्मळ शब्दांत मांडण्यात राष्ट्रपाल सावंत कमालीचे यशस्वी झाले आहेत.

शिक्षकी पेशा संभाळतानाच, आपल्या पेशाशी प्रामाणिक राहून नवनवीन व अभिनव उपक्रम राबविण्यात राष्ट्रपाल सावंत यांचा हातखंडा आहे. त्यातच त्याना लाभलेला पहाडी आवाज ही खरेच दैवी देणगी आहे. अंगभूत आवड असलेल्या साहित्यिक उपक्रमांबरोबरच इतर सामाजिक चळवळींतही लेखक अग्रेसर राहिले आहेत.

'गतस्मृतींची गजबज' हा खरे तर चार पिढ्यांचा लेखाजोखा आहे. या चारही पिढ्यांचे अतिशय खुमासदार शैलीत त्यांनी वर्णन केले आहे. या तब्बल चार पिढ्यांच्या प्रवासातल्या बऱ्यावाईट आठवणींचा 'कल्लोळ' म्हणजे हे पुस्तक आहे. मात्र वाईटातूनही चांगले शोधणारा त्यांचा स्वभाव त्यांचे व्यक्तिमत्त्व, लिखाण अधिक समृद्ध करतो. परिस्थितीने जागोजागी दिलेले चटके विसरून लेखक आयुष्याकडे सकारात्मक भावनेने पाहतो, तसे लिखाण करतो. त्यामुळेच आयुष्यातील अनेक प्रसंग अधिक रंगवून लिहिण्याऐवजी लेखकाने वास्तविक लिखाणास प्राधान्य दिले आहे. आयुष्यात अनेक चढउतार सोडल्यानंतर, सोसताना लेखक स्वतःच्या काही तत्वांशी ठाम राहिला याचे चित्रण पुस्तकातील अनेक प्रकरणांतून दिसते. लेखक धारावीसारख्या झोपडपट्टीत राहून त्याने कधी वाम मार्गाचा अवलंब केला नाही. वेश्यागमन, शिविगाळ, दारु, सिगारेट, चोरी, मारामारी यांसारख्या दुष्कृत्यांपासून लेखक नेहमीच दूर राहिला. या तत्त्वनिष्ठेतून आपणही बरेच काही शिकण्यासारखे आहे. त्यामुळेच अगदी प्रत्येकाने हे पुस्तक वाचावयास हवे असे मला पुन्हा पुन्हा आग्रहाने सांगावेसे वाटते.

'बाळपणीचा काळ सुखाचा' असे सारेच म्हणतात. मात्र राष्ट्रपाल सावंतांच्या पिढीने किंवा त्यांच्या आधीच्या काही पिढ्यांनी आयुष्यात जे काही सोसलेय ते कधीच 'सुखावह' नव्हते. आजची आर्थिक, भौगोलिक आणि शैक्षणिक सुबत्ता पाहता खरे तर आताची पिढी फार भाग्यवान आहे असेच म्हणावे लागेल. कारण वर उल्लेख केलेल्यापैकी काही सोसणे या पिढीच्या वाट्याला आले नाही. मात्र यासाठीच आजच्या पिढीने अशी पुस्तके, आत्मचरित्रे वाचण्याची व समजून घेण्याची खरी गरज आहे. आपल्या मागच्या पिढ्यांनी असा संघर्ष केला नसता, जिद्द दिखविली नसती, संकटांशी किंवा परिस्थितीशी झगडतानाच आयुष्याची अशी घडी बसविली नसती तर आपण आज कुठे असतो याचा आजच्या पिढीस विचार करावयास भाग पाडणारे 'गतस्मृतींची गजबज' हे पुस्तक प्रत्येकाने वाचावयास हवे असे आवर्जून सांगावेसे वाटते.



## शापवाणी

जरा तरी असो | मर्यादा मनाशी |
माझ्या संपत्तीशी | लेकरांनो ||१||

खनिजाचा साठा | खोदून काढता |
नियम मोडता | धनापायी ||२||

काय बोलू सांगा | झाडांबद्दल त्या |
रोज त्यांच्या हत्या | चालू चालू ||३||

प्रदुषण पर्व | चाले बारमाही |
गटारा प्रवाही | नदी वाहे ||४||

हवेचा गोडवा | घालविला तुम्ही |
म्हणे शोधू आम्ही | ऑक्सिजन ||५||

पायावरी धोंडा | आपल्या मारता |
आणि जाता येता | कंठशोष ||६||


माता म्हणुनिया | वाटे कळवळा |
माझा गोतावळा | मारलात ||७||

किती वेळा तुम्हा | करावे सावध |
आता रे पारध | तुमचीच ||८||

वेळ मजवर | तुम्हीच आणली |
शापवाणी आली | आतूनच ||९||

**पी.एस.कौलापुरे.**
**आरवली, शिरोडा.**

# काव्यांगण



## ऊन

**मालती तावडे ,मुंबई**

दुपारचे ऊन जणू,
सोन्याची शलाका,
आभाळही जळजळीत,
झालंय आता पाखरांच्या बाळका!

झाडांची सावली शोधतो,
तो खेळातला वारा,
घामाच्या थेंबांतून,
मिळते उन्हाची कहाणी सारा.

आंब्याचं बहरले गारवा,
रासवं आणि फोडणीचा भरवा,
कच्च्या कैरीची चव लज्जतदार,
आजीच्या हातचा आमरस होतो तयार.

पाण्याच्या बाटल्या ह्या सख्या,
सावलीचं सोनं वाटतं त्याच्या नशा,
थंडगार लिंबूपाणी प्यालं की वाटतं,
जगण्यातला एकच थेंब... जीवनाचं खरं असतं.

शाळेच्या सुट्ट्या, शिबीर, गावची वारी,
भातुकली, क्रिकेट आणि विहिरीची शपथ भारी!
उन्हाळा नाही फक्त तापलेला ऋतू,
तो तर आठवणींचा एक सुंदर गोतावळा भरलेला पिटारा.

## चेहरे

सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर उभा मी
पहातो जेंव्हा मागे वळून
एकामागून एक चेहरे
निघून जाती चक्षु समोरून

काही बोलके,काही अबोल
काही प्रसन्नतेने हसणारे
काही काळाच्या पडद्या आड गेलेले
विचारती मजला एकच प्रश्न
येईल का कधी आमची आठवण?

जीवनाच्या प्रवासातून
ते जातात मला प्रश्न विचारून..
पण मी मात्र सुटत नाही
आठवणीच्या जंजाळातून
बोलत राहतो स्वत:शीच
प्रत्येक चेहऱ्याचा इतिहास आठवून..

कधी सतावेल जेंव्हा एकटेपणा
किंवा उसवतील अंतरीच्या जखमा
तेंव्हा हे चेहरेच येतील धावून
अन बुजवतील त्या रक्ताळलेल्या जखमा
हळुवार फुंकर घालून...


संतोष पवार,
**सावंतवाडी**

# 🏠 मुलांच्या खोलीसाठी व वाचन खोलीसाठी वास्तु टिप्स

१. **खोलीची दिशा:**
- मुलांची खोली ईशान्य (उत्तर-पूर्व) किंवा पूर्व दिशेला असावी. ही दिशा सकारात्मक उर्जा आणि शुद्धता देते.
- अभ्यास खोली पूर्व किंवा उत्तर दिशेस असेल तर मुलांचे लक्ष अभ्यासात अधिक राहते.

**२. अभ्यास करताना बसण्याची दिशा:**
- मुलांनी पूर्व किंवा उत्तर दिशेला तोंड करून अभ्यास करावा. यामुळे स्मरणशक्ती आणि एकाग्रता वाढते.
- पाठीमागे भिंत असावी, ज्यामुळे आधार मिळतो.

**३. अभ्यास टेबल व खुर्ची:**
- टेबल लाकडी आणि चौकोनी असावी. काचेच्या टेबलांचा वापर टाळावा.
- टेबल स्वच्छ व नीट ठेवावा. टेबलवर अनावश्यक वस्तू ठेवू नयेत.
- खुर्ची पाठीला आधार देणारी असावी.



**४. प्रकाश व हवा:**
- खोलीत नैसर्गिक प्रकाश व स्वच्छ हवा खेळती असावी.
- अभ्यास खोलीत उजेड योग्य प्रमाणात हवा. पूर्वेकडून किंवा उत्तर दिशेने प्रकाश येणे उत्तम.

**५. रंगसंगती:**
- खोलीत हलक्या व सौम्य रंगांचा वापर करावा – जसे की फिकट पिवळा, आकाशी, हिरवा, पांढरा.
- लाल, काळा किंवा फारच गडद रंग टाळावेत – हे मनावर ताण देतात.

**६. भिंतीवरील चित्रे आणि पोस्टर्स:**
- प्रेरणादायी व सकारात्मक चित्रे लावा – जसे की उगवता सूर्य, निसर्ग, ग्रंथ, बुद्धिमान व्यक्तींचे फोटो.
- युद्ध, हिंसा किंवा रडणारी चित्रे टाळावीत.

**७. आरसा आणि पलंग:**
- आरसा पलंगासमोर नसावा.
- मुलांचा पलंग दक्षिण किंवा पश्चिम भिंतीकडे डोकं करून असावा.
- पलंगखाली सामान साठवलेले नसावे – सकारात्मक उर्जा अडते.

**८. इलेक्ट्रॉनिक उपकरणे:**
- अभ्यासाच्या खोलीत टीव्ही, मोबाइल, गेमिंग डिव्हाईसेस शक्यतो ठेवू नयेत.
- अभ्यासाच्या वेळेस इलेक्ट्रॉनिक उपकरणांपासून लांब राहणे आवश्यक आहे.

**९. घड्याळ आणि वेळेचे भान:**
- पूर्व किंवा उत्तर भिंतीवर एक सतत चालू घड्याळ लावावे – वेळेचे भान राहते.

**१०. अभ्यास साहित्याचे नियोजन:**
- पुस्तके उत्तरेला ठेवावीत.
- पूर्वेकडील भिंतीवर पुस्तकांचे कपाट किंवा अभ्यास साहित्य ठेवण्यास प्राधान्य द्यावे.

**टीप:** वास्तुशास्त्र हे एक मार्गदर्शक शास्त्र आहे. मुलांचे मनोबल, योग्य दिनक्रम, सकारात्मक संवाद आणि प्रेम याही गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या आहेत.